गुरूवार
०८
ऑक्टोबर २०२६
पुणे
पाने : ४
अंक : ७२
वर्ष : ६
किंमत : रू.३/-
मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील
epaper.chaluwartha.com
www.chaluwartha.com
RNI No.: MAHMAR/2021/82895

# दैनिक चालु वार्ता

तापमान
दिवस : 33° उच्च
रात्र : 22° किमान
सूर्योदय : ११ तास ४० मिनिटे
उगवणे :06:22 AM
मावळणे :06:10 PM
सूर्यास्त : १२ तास ५२ मिनिटे
उगवणे : 03:11 AM
मावळणे : 04:35 PM

LIVE
24k सोने प्रति १० ग्रॅम रू.१,१४,९५७/-
22k सोने प्रति १० ग्रॅम रू. १,३७,१००/-
चांदी प्रति किलो रू. २,३५,०००/-
डॉलर प्रति दर रू.९५.४३

# बळीराजाची दिवाळी काळी होणार नाही !

## मोदींसोबतच्या भेटीत दुष्काळावर चर्चा; शिंदेंनी सांगितलं चर्चेत काय ठरलं ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकिय कारकिर्दीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणीत सायकल आणि शिलाई मशीन वाटपाचे आयोजन केले. भाषणावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी दिल्लीत झालेल्या भेटीबद्दल एकनाथ शिंदेंनी उल्लेख केला. पंतप्रधानांसोबत जवळपास एक तास चर्चा झाली. त्यातील अर्धा तास चर्चा ही फक्त महाराष्ट्रातील दुष्काळावर झाली, असे एकनाथ शिंदे म्हणाले.



**लाडक्या बहिणींना मदतीचा हात देण्याचा मी संकल्प केला**

परभणीत बोलताना एकनाथ शिंदे यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. 'महिनाभरापूर्वी परभणीत आलो होतो, तेव्हाही माझ्या लाडक्या बहिणी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र, आजची परिस्थिती वेगळी आहे. राज्यावर दुष्काळाचं संकट आहे. त्यामुळे बळीराजाच्या मुलींना आणि लाडक्या बहिणींना मदतीचा हात देण्याचा मी संकल्प केला आहे, असं शिंदे म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी आपल्याला सुमारे एक तास वेळ दिला. या भेटीत जवळपास अर्धा तास महाराष्ट्रातील दुष्काळावर चर्चा झाली. शेतकरी, लाडक्या बहिणी आणि दुष्काळाची परिस्थिती याबाबत पंतप्रधानांनी माहिती घेतल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

**सरकारने शेतकऱ्यांना एकटं सोडलं नाही**

'संकट मोठं आहे, मात्र शेतकऱ्यांना सरकारने कधीही एकटं सोडलं नाही. मुख्यमंत्री असतानाही नियम आणि अटी शिथिल करून शेतकऱ्यांना मदत केली. आम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची परिस्थिती पाहिली. अनेक शेतकरी आपल्या व्यथा सांगताना भावूक झाले होते. त्यावेळीही सरकार तुमच्या पाठीशी आहे, असा विश्वास आम्ही दिला, असं शिंदे यांनी नमूद केलं.

**पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी राहण्याचं आश्वासन दिलं**

राज्यातील जवळपास ८० टक्के भागातील पिकांचं नुकसान झाल्याचा दावा करत शिंदे यांनी बळीराजा हा देशाचा अन्नदाता असल्याचं सांगितलं. पंतप्रधान मोदींनी शेतकऱ्यांच्या पाठीशी राहण्याचं आश्वासन दिल्याचंही त्यांनी सांगितलं. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे नुकसान झालं, तेव्हाही सरकारने मदत केली आणि यंदाच्या दुष्काळातही शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला जात आहे, असं शिंदे म्हणाले. बळीराजाची दिवाळी काळी होऊ देणार नाही, हा शब्द मी माझ्या लाडक्या बहिणी आणि शेतकरी बांधवांना देतो, असं आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिलं.

## देश विदेश थोडक्यात

### निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचा विषय पुन्हा सुप्रीम कोर्टात;

**नव्या याचिकेची CJI सूर्यकांत यांनी घेतली दखल...**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी सातत्यानं आंदोलनं सुरु असतानाच आता त्यांच्या नियुक्तीबाबतच एक मोठी अपडेट समोर आली आहे. भारतीय निवडणूक आयोगातील आयुक्तांच्या नियुक्त्यांबाबत सुप्रीम कोर्टातील न्यायाधिशांचा निर्णय मागे घेण्यासंबंधी याचिका सुप्रीम कोर्टात याचिका दाखल झाली आहे. या याचिकेचा विचार करण्यास सरन्यायाधिशांनी सहमती दर्शवली आहे.

**नेमका विषय काय?**

भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर दोन निवडणूक आयुक्त यांच्याशी संबंधित २०२३ मधील कायद्यावर सुप्रीम कोर्टातील दोन वकिलांनी विभाजीत निर्णय दिला होता. हा निकाल मागे घेण्यासाठी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल झाली आहे. या कायद्याला आव्हान देण्यासाठी याचिकांना मोठ्या घटनापीठाकडं पाठवावं किंवा नाही या प्रश्नावर २३ सप्टेंबर रोजी सुप्रीम कोर्टाच्या दोन न्यायाधिशांच्या खंडपीठानं एकमतानं निर्णय दिला नव्हता तर दोघांनीही वेगवेगळा निर्णय दिला होता.

न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठानं या प्रश्नावर भिन्न निर्णय दिला होता. २०२३ च्या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांना मोठ्या घटनापीठाकडं पाठवायचं की नाही? असा हा प्रश्न होता. या कायद्यान्वये मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करणाऱ्या पॅनलमधून देशाच्या सरन्यायाधिशांना वगळण्यात आलं होतं.

**आता प्रकरणं पोहोचलं सरन्यायाधिशांच्या कोर्टात**

खंडपीठानं म्हटलं होतं की, दोन्ही न्यायाधिशांची मत भिन्न असल्यानं हे प्रकरण सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या समोर प्रशासकीय बाब म्हणून मांडलं जावं. कारण यासाठी योग्य संख्येच्या घटनापीठाची नियुक्ती केली जावी, तसंच या मुद्द्यावर प्रभावी तसंच अधिकृत निर्णय घेतला जावा.

**सरन्यायाधिशांच्या खंडपीठासमोर आलं प्रकरण**

बुधवारी सरन्यायाधीश आणि न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर वरिष्ठ अधिवक्ते गोपाल शंकरनारायणन यांनी या रिकॉल अर्जाचा उल्लेख केला. त्यांनी कोर्टाला सांगितलं की, नुकत्याच झालेल्या निर्णयाला मागे घेण्याच्या अर्जावर सुनावणी करु इच्छितात. सरन्यायाधीश यावर म्हणाले, 'आम्ही याची चौकशी करुन आणि निर्णय घेऊ...

**आधी न्या. दत्ता यांच्या खंडपीठासमोर झाला होता उल्लेख**

शंकरनारायणन यांनी खंडपीठाला सांगितलं की, 'रिकॉलच्या अर्जाचा उल्लेख यापूर्वी न्या.दत्ता यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर झाला होता. पण नंतर हे प्रकरण त्या खंडपीठासमोरुन हटवण्यात आलं होतं यानंतर त्यांना सीजेआयच्या समोर याचा उल्लेख करण्यास सांगण्यात आलं. वरिष्ठ अधिवक्त्यांनी सांगितलं की, मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीवर निर्णय आला आहे. आम्ही हा निर्णय मागे घेण्यासाठी एका अर्जाचा उल्लेख

(पान २ वर...☞)

## बांगलादेशची हिंमत वाढली, थेट भारताकडे दाखवले बोट, आता हे बदलणे...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** बांगलादेश गेल्या काही दिवसांपासून भारतासोबत पंगे घेताना दिसत आहे. पाकिस्तानसोबत जवळीकता वाढली आहे. त्यातच गंगा जल करारावरून भारताकडे बांगलादेशने बोट दाखवले. बांगलादेशचे जल विशेषज्ञ मंजूर ए.चौधरी यांनी भारत आणि बांगलादेश यांच्यात १९९६ मध्ये गंगा जल करार आता बदलला आहे, त्यात अनेक दोष आहेत. त्यात काही गारंटी नाही.

द हिंदूच्या रिपोर्टनुसार, बांगलादेश नॅशनल कंजर्वेशन कमिशनचे माजी अध्यक्ष मंजूर ए. चौधरी यांनी म्हटले की, गंगा जल करार हा डिसेंबर महिन्यात संपणार आहे. यादरम्यान दोन्ही देशांनी आपत्कालीन करार करायला हवा. सरळ यावर बसून चर्चा करायला हवी. चौधरी यांच्या म्हणण्यांनुसार, गंगा जल करार हा तब्बल तीन दशके जुना आहे. त्यात काही महत्वपूर्ण गोष्टींचा समावेश नाही. या करारात पर्यावरणाच्या प्रवाहाकडे लक्ष देण्यात आले नाही. जलपरिवर्तनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. सर्वात महत्वाचे या करारात आहे की, पाण्याचे वाटत ठरवले पाहिजे.

कोणत्याही करारात नदीकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. हा करार संपण्यापूर्वी दोन्ही देशांनी सुरुवातीला



तात्काळ तीन वर्षांसाठी करार करावा. या काळात मग गंगा जल करार करावा. ज्यात सर्व गोष्टीचा विचार व्हावा. डिसेंबर महिन्यातच हा करार संपत असल्याने वेळ कमी आहे. मुळात म्हणजे भारत आणि बांग्लादेश गंगा जल करार हा दोन्ही देशांच्या व्दिपक्षीय संबंधांवर आधारित आहे.

कमी पाणी असलेल्या महिन्यांमध्ये नेपाळच्या घाघरा, गंडक आणि कोसी नदींचे पाणी गंगा नदीत येते. गंगा नदीची देखरेख करणे आवश्यक असल्याचेही यादरम्यान त्यांनी म्हटले. त्यामुळेच बांगलादेशने या करारात नेपाळलाही सहभागी करण्याची मागणी केली. ढाकातील संमेलनातही त्यांनी हा मुद्दा मांडला होता. सध्यातरी हा करार फक्त भारत आणि बांगलादेशापर्यंतच मर्यादित आहे.

बांगलादेशचे माजी पूर्व विदेश सचिव फारूक सोभान यांनी गंगा जर करारात काही दोष असल्याचे म्हटले होते. भारत आणि बांग्लादेश यांच्यातील संबंध गेल्या काही दिवसांपासून तणावात आहेत. त्यातच आता गंगा जल करार तोंडावर आहे. गंगा जल करारात बांगलादेश भारताकडे बोट दाखवताना दिसत आहे.

## शाळांची दुरवस्था नव्हे ; तर इस्लाम...

### फ्रान्समधील हिंसक निदर्शनांवर डोनाल्ड ट्रम्प यांचा खळबळजनक दावा!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** शिक्षकांची टंचाई, खराब पायाभूत सुविधां, आणि शाळांच्या जर्जर इमारती, या मुद्द्यांवरून सुरू असलेल्या आंदोनलाने संपूर्ण फ्रान्स दणानून गेला आहे. मंगळवारी फ्रान्समध्ये झालेल्या निदर्शनांमध्ये अडीच लाखांहून अधिक लोकांनी सहभाग घेतला होता. या आंदोलनावरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक खळबळजनक अत्यंत वादग्रस्त विधान केले आहे. 'फ्रान्समधील निदर्शने ही शाळांच्या समस्येवरून नसून, अनियंत्रित स्थलांतर आणि इस्लामच्या वाढत्या प्रभावाशी संबंधित आहेत,' असा खळबळजनक दावा ट्रम्प यांनी केला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांचा सोशल मीडियावरून दावा ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करत, 'हा मुद्दा शाळांचा अथवा शिक्षणाचा नाही तर, बेकायदेशीर स्थलांतराचा आहे. इस्लाम फ्रान्सवर आपले वर्चस्व प्रस्थापित करू पाहत आहे.'महत्वाचे म्हणजे, अमेरिकन मध्यावर्धी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी आपल्या स्थलांतरविरोधी राजकीय अजेंड्याची आठवण करून देण्यासाठीच फ्रान्समधील परिस्थितीचा संदर्भ दिल्याचे मानले जात आहे.



शाळांच्या दयनीय अवस्थेचा मुद्दा – फ्रान्समधील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मंगळवारी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. त्यांनी शाळांसाठी चांगल्या सुविधा व अधिक निधीची मागणी केली. शिक्षकांची कमतरता, वर्गातील प्रचंड गर्दी, मोडकळीस आलेल्या इमारती, निकृष्ट देखभाल आणि शालेय आवश्यक सुविधांचा अभाव या आंदोलकांची तक्रार आहे. याशिवाय, वर्गखोल्यांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी, छतावरून टपकणारे पाणी, शिक्षकांची मोठी टंचाई आणि काही शाळांमध्ये उंदरांचा सुळसुळाट ही देखील या आंदोलनाची कारणे आहेत.

ही निदर्शने सर्वप्रथम सप्टेंबरमध्ये पॅरिसच्या जवळपास तुलनेने कमी उत्पन्न असलेल्या भागांमध्ये सुरू झाली. यानंतर याचे लोन देशभरात पसरले, ज्यामुळे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या सरकारवर मोठ्या प्रमाणावर दबाव वाढला.

अनेक शहरांमध्ये पोलिसांशी संघर्ष अनेक भागांमध्ये निदर्शने शांततापूर्ण राहिली. मार्सेल आणि नँटमध्ये आंदोलकांनी शिक्षण व्यवस्थेच्या स्थितीविरोधात घोषणाबाजी केली, तर तुलूझमध्ये पालकही मोर्चात सामील झाले होते. मात्र, स्ट्रासबर्ग, लिऑन आणि रेनेस सारख्या शहरांमध्ये आंदोलकांनी जाळपोळ करत पोलिसांवर दगडफेक केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना अश्रूधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. दरम्यान, सिंडिकेल लिसेन या युनियननुसार देशातील तब्बल २००० हायस्कूल बंद राहिले, तर सरकारने ८९१ शाळा प्रभावित झाल्याचे म्हटले आहे.

## एकदा पक्षाबाहेर पडलात तर कायमचे बाहेर व्हाल!

### सुनेत्रा पवारांचा बंडखोरांना इशारा...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**बारामती :** बारामतीमध्ये सध्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची रणधुमाळी सुरुय. अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बंडखोरीमुळे राजकीय वातावरण तापलंय. या बंडखोरीवरून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बंडाळी करणाऱ्यांना गंभीर इशारा दिलाय. अजितदादा मोठे मनाचे होते, पण मी दादासारखी नाहीये. तुम्ही एकदा बाहेर गेलात तर कायमचे बाहेरचेच व्हाल, असा इशारा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार प्रचारसभेत बोलताना दिलाय.

राष्ट्रवादीतून बंडाचे निशाण उभारलेले नेते पुरुषोत्तम जगताप यांना भाजपच्या पाठिंब्याने 'लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनल' निवडणूक रिंगणात उतरवलंय. या पार्श्वभूमीवर अजितदादांचे नाव न वापरता स्वतःच्या जीवावर निवडणूक लढवून दाखवा, असे थेट आव्हान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिलंय. त्या आव्हानाला पुरुषोत्तम जगताप यांनी जोरदार



प्रत्युत्तर दिलं. आता पुन्हा एकदा पुरुषोत्म जगताप यांना इशारा दिला.

आपल्या सर्वांचे संबंध चांगलेत. नंतर कोण जवळ येणार अशा अनेक अफवा आहेत. कुठल्याही चुकीच्या अफवेला बळी पडू नका, एकदा बाहेर ते कायमचे बाहेर, एवढे लक्षात ठेवा. दादा खूप मोठ्या मनाचे होते दादांसारखी मी नाही' असा थेट इशारा त्यांनी पुरुषोत्तम जगताप यांचे नाव न घेता दिलाय. अनेक चुकीच्या अफवा ऐकायला येत आहेत. कारखान्याचा अध्यक्ष हा सर्वसमावेशक असेल. सर्वांच्या मर्जीनूसार अध्यक्षांची निवड केली जाईल. अध्यक्ष अगोदर ठरवलेला नाहीये. निवडणुकीच्या निकालानंतर कोण अध्यक्ष ठरवू असंही त्या यावेळी म्हणाल्या.

**पुरुषोत्तम जगताप यांच्यावर कारवाई होणार**

मंगळवारी जय पवार यांच्याहस्ते श्री सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार पॅनलचा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. यावेळी जय पवार यांनीही पुरुषोत्तम जगताप यांना इशारा दिला होता. तसेच त्यांनी जगताप यांच्यावर कारवाई केली जाईल असं म्हटलंय. सुनेत्रा पवार यांचा व्हिडिओ वापरून ते त्यांच्या पॅनेलचा प्रचार करत आहेत. त्यामुळे आम्ही पक्षाच्या वतीने त्यांच्यावर कारवाई करणार आहोत' असं जय पवार यांनी सांगितलं. जगताप हे अजित पवार आणि सुनेत्रा पवार यांच्या नावानेच त्यांच्या पॅनलचा प्रचार करत असल्याचं जय पवार म्हणालेत.

## जरांगेंची कोंडी वाढली! आंदोलनातील महिलांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट; गंभीर आरोप करत गुन्ह्याची मागणी...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर होणाऱ्या आरोपांचे सत्र सुरूच असून, मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयक रेखा कोंडे आणि अंतरवाली सराटी येथील रहिवासी ललिता तारक यांनी जरांगेंवर गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. याप्रकरणी त्यांनी पोलीस स्टेशनसह थेट मंत्रालयात जाऊन राज्य सरकारकडे तक्रार दाखल केली आहे. पाटोदा येथील आंदोलन अचानक मागे घेणे आणि अंतरवाली सराटीतील आंदोलनाचा स्टेज हटवणे या निर्णयांवर प्रश्न उपस्थित केल्यामुळे जरांगेंच्या समर्थकांनी आपल्याला अश्लील भाषेत शिवीगाळ केली, बदनामी केली आणि बलात्काराच्या धमक्या दिल्या, असा आरोप या दोन्ही महिलांनी केला आहे. यासंदर्भात अनेकदा पोलिसांत तक्रारी



देऊनही कोणतीही कारवाई न झाल्याने त्यांनी नुकतीच राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांची मंत्रालयात भेट घेतली.

आपण राज्याच्या 'लाडक्या बहिणी' असून आपल्याला त्वरित न्याय मिळावा, अशी मागणी त्यांनी या भेटीत केली. मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन गृहविभागाला चौकशी व योग्य कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. रेखा कोंडे यांनी स्पष्ट केले की, २०२३ पासून मराठा समाजाच्या प्रश्नासाठी जरांगे यांना पाठिंबा दिला होता. मात्र आझाद मैदानातील आंदोलनानंतर आणि पाटोद्यात अचानक आंदोलन गुंडाळल्यामुळे त्यांचा जरांगेंवरील विश्वास उडाला.

दरम्यान विखे पाटील यांनी मानलेल्या मागण्यांचे पत्र मागितले असता, जरांगेंच्या समर्थकांनी चारित्र्यहनन सुरू केले. मनोज जरांगे पाटील यांनी समाजाची फसवणूक केली असून आता ते उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाहीत, असा आरोपही तक्रारदारांनी केला आहे.त्यामुळे आता जरांगे पाटील यांची यावर काय भुमिका असणार हें पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# अनधिकृत व नियमबाह्य बांधकामावर ३ महिने उलटूनही नगरपरिषद प्रशासनाकडून कारवाईबाबत उदासीनता

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पालघर - प्रतिनिधी**
**रवि राठोड**

**पालघर :** मे. ए. आय. कॅन एक्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड व मे. पी. सी. एस. अल्युमिनियम या औद्योगिक आस्थापनांकडून अनधिकृत व नियमबाह्य बांधकाम करण्यात आलेले आहे. या बांधकामांबाबत ०८/०६/२०२६ व दिनांक १०/०८/२०२६ रोजी पालघर नगरपरिषदेत पालघर नगरपरिषदेचे नगरसेवक ॲड.धर्मेंद्र भट्ट यांनी लेखी तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारीला ३ महिन्यांचा कालावधी उलटूनही पालघर नगरपरिषदेच्या नगरविकास विभागाने अनधिकृत बांधकामाबाबत तोडक कारवाई केलेली नाही. त्यामुळे




**सदर प्रकरण पालघर नगरपरिषदेला भोवणार**

नगरसेवकांच्या तक्रारीला नगरविकास विभाग केराची टोपली दाखवत असेल, तर सर्वसामान्य माणसांच्या तक्रारीची दाद कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सदर बाब नगरपरिषदेच्या ३१/०७/२०२६ रोजीच्या मासिक सर्वसाधारण सभेमध्ये प्रश्न उपस्थित करून कारवाईची मागणी करण्यात आली होती. त्या संदर्भात १३/०७/२०२६ रोजी नगरपरिषदेचे कर अधिकारी अमोल बेलोटे यांनी संबंधित स्थळी जाऊन स्थळ पंचनामा केलेला आहे. असे असताना सदर अनधिकृत बांधकामावर शास्ती निश्चित केलेली नाही, घरपट्टी आकारण्याचा प्रस्ताव दिला नाही. त्यामुळे लाखो रुपयांची घरपट्टी बुडालेली असून नगरपरिषदेचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर अनधिकृत बांधकामामुळे नगरपरिषदेचा नगरविकास विभाग व संबंधित अधिकारी यांनी कारवाई करावी, अन्यथा न्यायालयीन प्रक्रियेस तयार राहावे, असा इशारा नगरसेवक ॲड. धर्मेंद्र भट्ट यांनी दिला आहे.

# पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघात तब्बल १५४ अर्ज, आज छाननी

## उमेदवारी मागे घेण्यासाठी शुक्रवारपर्यंत मुदत

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पुणे :** पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी एकूण १५४ अर्जांची नोंद झाली आहे. यामध्ये पदवीधर मतदारसंघातील ८७, तर शिक्षक मतदारसंघातील ६७ अर्जांचा समावेश आहे. दोन्ही मतदारसंघांत मिळून आज, मंगळवारी ८३ अर्ज भरले गेले असून, कालपर्यंत प्राप्त अर्जांची संख्या ७१ होती. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघासाठी सोमवार, ५ ऑक्टोबरपर्यंत ३३ अर्ज प्राप्त झाले होते. अर्ज करण्याच्या अखेरच्या दिवशी मंगळवारी (दि. ६) आणखी ५४ अर्ज भरले गेले. त्यामुळे या मतदारसंघातील एकूण अर्जांची संख्या ८७ झाली आहे. आपण दिलेल्या नोंदीनुसार, या मतदारसंघात आधीच्या दिवसांतील एकत्रित अर्जांपेक्षा आज भरलेल्या



अर्जांची संख्या अधिक आहे.

**शिक्षक मतदारसंघातील अर्जांची स्थिती**

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी सोमवार, ५ ऑक्टोबरपर्यंत ३८ अर्ज प्राप्त झाले होते. तर अर्ज करण्याच्या अखेरच्या दिवशी मंगळवारी (दि. ६) २९ अर्ज भरले गेले. त्यामुळे शिक्षक मतदारसंघातील एकूण अर्जांची संख्या ६७ झाली आहे.

**दोन्ही मतदारसंघांची एकत्रित आकडेवारी**

मतदारसंघ - ५ ऑक्टोबरपर्यंत प्राप्त अर्ज - ६ ऑक्टोबर रोजी भरलेले अर्ज - एकूण अर्ज पदवीधर - ३३ - ५४ - ८७

शिक्षक - ३८ - २९ - ६७ एकूण - ७१ - ८३ - १५४

**माघारीसाठी शुक्रवार अंतिम दिवस**

निवडणूक कार्यक्रमानुसार, अर्जांची छाननी बुधवारी (दि.७) सकाळी ११ वाजेपासून विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी शुक्रवारी (दि.९) दुपारी ३ वाजेपर्यंत मुदत आहे. त्यामुळे छाननी आणि माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन्ही मतदारसंघांतील अंतिम निवडणूक लढतीचे चित्र स्पष्ट होईल. निवडणूक कार्यक्रमानुसार, दोन्ही मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर मतदान होणार आहे. तर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे.

# तुडीयेतील एअरटेल 4G सेवा कुचकामी; ग्राहकांचा पोर्टिंगचा इशारा!

## नेटवर्क असूनही इंटरनेट ठप्प; बँकिंग, वैद्यकीय सेवा, शिक्षणासह दैनंदिन व्यवहारांना फटका

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**चंदगड - प्रतिनिधी**
**संदिप कांबळे**

**कोल्हापूर :** डिजिटल युगात इंटरनेट ही अत्यावश्यक गरज बनली असताना तुडीये परिसरातील एअरटेलची 4G सेवा मात्र ग्राहकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. मोबाईलवर नेटवर्कचे सिग्नल दिसत असले, तरी इंटरनेट आणि कॉलिंग सेवा व्यवस्थित चालत नसल्याने ग्राहकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नियमित रिचार्ज करूनही अपेक्षित सेवा मिळत नसल्याने एअरटेल प्रशासनाने तातडीने नेटवर्कची समस्या सोडवावी, अन्यथा अन्य नेटवर्ककडे वळण्याशिवाय पर्याय राहणार नसल्याचा इशारा ग्राहकांनी दिला आहे. तुडीये हे परिसरातील



महत्त्वाचे व्यापारी व सेवा केंद्र आहे. येथे शेती औषधांची दुकाने, दवाखाने, मेडिकल, बँक ऑफ महाराष्ट्र, केडीसी बँक, सहकारी संस्था, तालुका व जिल्हा संघ तसेच महाविद्यालये आहेत. या सर्व ठिकाणी ऑनलाइन व्यवहार, डिजिटल पेमेंट, बँकिंग, शैक्षणिक कामकाज आणि माहितीच्या देवाणघेवाणीसाठी इंटरनेटची आवश्यकता असते. मात्र, एअरटेलचे नेटवर्क सक्षम नसल्याने नागरिक, व्यावसायिक, विद्यार्थी आणि ग्राहकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, परिसरातील आजूबाजूच्या गावांतून तुडीये येथे विविध कामांसाठी येणाऱ्या एअरटेल ग्राहकांनाही इंटरनेटअभावी गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. स्वतःच्या मोबाईलमध्ये एअरटेलचे सिमकार्ड असूनही इंटरनेट वापरता येत नसल्याने अनेकांना नाइलाजाने दुकानदारांकडून जिओ हॉटस्पॉट घेऊन पैसे मोजावे लागत आहेत. स्वतःच्या सेवेसाठी रिचार्ज करूनही दुसऱ्या कंपनीच्या नेटवर्कवर अवलंबून राहण्याची वेळ ग्राहकांवर येत असल्याने संताप व्यक्त होत आहे. मोबाईल कंपन्या वेगवान इंटरनेटच्या जाहिराती करत असताना तुडीयेतील ग्राहकांना साधे इंटरनेट वापरण्यासाठीही संघर्ष करावा लागत आहे. नेटवर्कची समस्या वारंवार उद्भवत असतानाही त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत, असा सवाल उपस्थित होत आहे.

एअरटेल प्रशासनाने तुडीये परिसरातील नेटवर्कची तातडीने तांत्रिक तपासणी करून इंटरनेट व कॉलिंग सेवा सुरळीत करावी. तसेच वाढत्या डिजिटल गरजा लक्षात घेऊन या भागात 5G सेवा लवकरात लवकर सुरूकरावी, अशी मागणी ग्राहकांतून होत आहे. अन्यथा मोठ्या संख्येने ग्राहक एअरटेलला रामराम ठोकून अन्य नेटवर्ककडे वळण्याच्या तयारीत असल्याने प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# महाज्योतीच्या परीक्षेत गोंधळ; पुणे-नांदेडमधील दोन केंद्रांवरील परीक्षा रद्द, विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा होणार

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पुणे :** महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षांमधील गोंधळाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संयुक्त गट-ब आणि गट-क परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी महाज्योती आणि वनार्टी संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेतील पुणे आणि नांदेड येथील दोन परीक्षा केंद्रांवरील परीक्षा रद्द करण्यात आली आहे. महाज्योतीकडून जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी पुणे आणि नांदेडमधील संबंधित केंद्रांवर होणारी चाळणी परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घेण्यात येणार असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे. फेरपरीक्षेची तारीख अद्याप जाहीर नाही संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घेण्यात येणार असली तरी त्याची तारीख आणि वेळ अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. फेरपरीक्षेबाबतच्या पुढील सूचना महाज्योती आणि वनार्टी संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे रद्द झालेल्या दोन्ही केंद्रांवरील विद्यार्थ्यांनी अधिकृत सूचनांकडे लक्ष ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नवा वाद? राज्यात विविध स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांवरून विद्यार्थ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत असतानाच महाज्योतीच्या चाळणी परीक्षेतील दोन केंद्रांवरील परीक्षा रद्द करण्याचा निर्णय समोर आला आहे. त्यामुळे



या निर्णयावरून राजकीय वातावरणही तापण्याची शक्यता आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावरून सरकारवर निशाणा साधत जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे. महाज्योतीच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करत संबंधित मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी पुढे येत आहे. मात्र, पुणे आणि नांदेडमधील परीक्षा केंद्रांवरील परीक्षा नेमक्या कोणत्या कारणामुळे रद्द करण्यात आल्या, याबाबत महाज्योतीच्या उपलब्ध परिपत्रकात सविस्तर कारण नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे परीक्षेतील नेमका गोंधळ काय झाला, याबाबत अधिकृत स्पष्टीकरणाची प्रतीक्षा आहे. आता फेरपरीक्षेची तारीख कधी जाहीर होते आणि परीक्षा रद्द करण्यामागील कारणाबाबत महाज्योतीकडून काय स्पष्टीकरण दिले जाते, याकडे विद्यार्थ्यांचे आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. कोणती दोन परीक्षा केंद्रे रद्द? महाज्योतीच्या परिपत्रकात रद्द करण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : -Sun Bright English Medium School, Pune - Marathwada Online Exam Centre, Nanded या दोन्ही केंद्रांवर ७ ऑक्टोबर रोजी परीक्षा देण्यासाठी केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा पुन्हा घेतली जाणार आहे.

# शासनाचा GR, नागरिकांचे अर्ज मग दिव्यातील २०११ पूर्वीच्या घरांचे नियमितीकरण कधी?

## शासकीय भूखंडांवरील पात्र निवासी अतिक्रमणांच्या नियमितीकरणासाठी नागरिकांकडून अर्ज; पालिका प्रशासनाच्या कार्यवाहीकडे लक्ष

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**दिवा - प्रतिनिधी**
**नागेश पवार**

**ठाणे (दिवा) :** राज्य शासनाने १ जानेवारी २०११ पूर्वी अस्तित्वात असलेल्या शासकीय जमिनीवरील पात्र निवासी अतिक्रमणांचे नियमितीकरण करण्यासाठी धोरण जाहीर केले आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून आपल्या घराच्या मालकी हक्काच्या प्रतीक्षेत असलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शासनाच्या निर्णयानुसार पात्र नागरिकांना नियमितीकरणासाठी अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२६ आहे.

दरम्यान, दिवा परिसरातील काही नागरिकांनी शासनाच्या निर्णयाचा आधार घेत ठाणे महानगरपालिकेकडे नियमितीकरणासाठी अर्ज केले आहेत. मात्र, संबंधित अर्जांवर अद्याप ठोस व अंतिम कार्यवाही झालेली नसल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे शासनाचा निर्णय लागू झाल्यानंतरही अर्जांची छाननी, पात्रता तपासणी आणि पुढील प्रशासकीय कार्यवाही नेमकी कोणत्या टप्प्यावर आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शासनाचा निर्णय जाहीर झाल्यानंतर संबंधित नागरिकांच्या अर्जांवर कोणती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, किती अर्ज प्राप्त झाले आहेत, किती अर्जांची छाननी झाली आहे आणि किती प्रकरणे पुढील सक्षम प्राधिकरणाकडे पाठविण्यात आली आहेत, याची माहिती प्रशासनाने सार्वजनिक करणे आवश्यक आहे. तसेच, या प्रक्रियेसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी अथवा विशेष कक्ष नियुक्त करणे, नागरिकांच्या अर्जातील त्रुटी असल्यास त्या लेखी स्वरूपात कळविणे आणि पात्र प्रकरणांवर वेळेत कार्यवाही करणे, अशी मागणी नागरिकांकडून होणे अपेक्षित आहे. शासनाच्या धोरणानुसार पात्र ठरणाऱ्या नागरिकांनी १ जानेवारी २०११ पूर्वी अस्तित्वात असलेल्या निवासी अतिक्रमणाच्या नियमितीकरणासाठी ३१ डिसेंबर २०२६ ही अंतिम मुदत संपण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करणे महत्त्वाचे आहे. मात्र, केवळ अतिक्रमण २०११ पूर्वीचे आहे म्हणून ते आपोआप नियमित होईल, असे समजणे योग्य ठरणार नाही. संबंधित शासन निर्णयातील अटी व पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे.

दिवा परिसरातील अनेक गरजू नागरिकांना शासनाच्या या निर्णयाची, पात्रतेची, आवश्यक कागदपत्रांची आणि अर्ज प्रक्रियेची पुरेशी माहिती नसण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठाणे महानगरपालिका प्रशासन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रभागनिहाय जनजागृती मोहीम राबवून नागरिकांना योग्य माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे,अखेर जनतेचे हित हेच सर्वतोपरी!



### महासभेत विषय उपस्थित करण्याची गरज

या प्रश्नाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनीही गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. स्थानिक नगरसेवकांनी महासभेत किंवा संबंधित समितीसमोर हा विषय उपस्थित करून दिवा परिसरात शासनाच्या या धोरणानुसार किती अर्ज प्राप्त झाले, त्यांची सद्यस्थिती काय आहे आणि नागरिकांच्या अर्जांवर वेळबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यासाठी पालिका प्रशासन काय उपाययोजना करणार आहे, याबाबत प्रशासनाकडून स्पष्ट माहिती मागणे अपेक्षित आहे.

विशेष म्हणजे, शासनाचा GR लागू झाल्यानंतर प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्रपणे पालिकेचा ठराव आवश्यक आहे का, याबाबतही प्रशासनाने कायदेशीर तरतूद व शासन निर्देश स्पष्ट करणे गरजेचे आहे. जर स्वतंत्र ठरावाची आवश्यकता नसेल, तर केवळ ठरावाच्या प्रतीक्षेत पात्र नागरिकांचे अर्ज प्रलंबित राहू नयेत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

# संविधानिक हक्कांसाठी आदिवासी हक्क संरक्षण महासंघ आक्रमक

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पालघर - प्रतिनिधी**
**रवि राठोड**

**पालघर :** आदिवासी समाजाच्या जल, जंगल, जमीन, रोजगार आणि संविधानिक अधिकारांच्या प्रश्नांवर केवळ निवेदने न देता संघटितपणे आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने लढा उभारण्याचा निर्धार आदिवासी हक्क संरक्षण महासंघाच्या पाचव्या सभेत करण्यात आला. नानिवली येथे ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता झालेल्या या सभेत पेसा भरतीतील अटी-शर्ती, पाचवी अनुसूची, वाढवण बंदर प्रकल्प, पाटबंधारे प्रकल्पांसाठी जमीन संपादित झालेल्या शेतकऱ्यांचा प्रलंबित मोबदला, आदिवासी भागातील सिंचन तसेच स्थानिकांना रोजगारातील प्राधान्य या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

विविध आदिवासी संघटना एकत्र आल्यास समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी मोठी ताकद निर्माण होऊ शकते, या भूमिकेतून महासंघाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. नव्या संस्था व संघटनांचा सहभाग वाढत असून विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यावर ठोस भूमिका घेण्यासाठी अभ्यासगट तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. शासनदरबारी सातत्याने पत्रव्यवहार करणे, निधीसाठी पाठपुरावा करणे आणि आदिवासींच्या



अधिकारांबाबत प्रशासनाला जाब विचारणे, अशी पुढील दिशा निश्चित करण्यात आली.

पेसा भरतीचा मुद्दा सभेत विशेष चर्चेत आला. भरतीसाठी १९५० पूर्वीचा पुरावा, प्रकल्पाचा पेसा दाखला यांसारख्या अटी-शर्तींच्या व्यवहार्यतेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. पेसा क्षेत्रात कायमस्वरूपी नियुक्ती झाल्यानंतर काही कर्मचाऱ्यांना नॉन-पेसा क्षेत्रात टाकण्यात आल्याच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. या प्रकरणी जिल्हा कार्यालयात जाऊन प्रशासनाकडे जाब विचारण्याची भूमिका घेण्यात आली. पेसा हा केवळ भरतीचा विषय नसून आदिवासींच्या संविधानिक अधिकारांचा प्रश्न असल्याचे सांगत पाचवी अनुसूची, पेसा कायदा आणि संविधानातील तरतुदींचा विचार करूनच आदिवासी भागातील निर्णय घेतले जावेत, यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींकडे निवेदन देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

वाढवण बंदर प्रकल्पाच्या मुद्द्यावरही महासंघाने ठोस भूमिका घेतली. आदिवासींची जमीन, पाणी, पर्यावरण आणि पारंपरिक उपजीविकेवर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका मांडत वाढवण बंदर प्रकल्प रद्द करण्यात यावा, अशी मागणी सभेत करण्यात आली. स्थानिकांच्या अधिकारांचा विचार न करता कोणताही प्रकल्प पुढे नेऊ नये, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली. संविधानिक तरतुदी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा विचार करून या प्रश्नावर पुढील भूमिका निश्चित करण्याचे ठरविण्यात आले.

पालघर जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी जमीन संपादित झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रलंबित मोबदल्याचा प्रश्नही सभेत ऐरणीवर आला. अनेक वर्षांपासून मोबदल्याच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा भूमिअधिग्रहणाचा मोबदला तातडीने मिळावा, यासाठी संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करून शासनदरबारी पाठपुरावा करण्याचे ठरविण्यात आले. त्याचबरोबर आदिवासी भागातील शेतीला पुरेसे सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठीही शासनाकडे ठोस मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कोतवाल भरतीमध्ये स्थानिकांना प्राधान्य मिळावे, यासाठी यापूर्वी करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराचा आढावाही घेण्यात आला. शासन निर्णय आणि कायदे केवळ कागदावर न राहता त्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी प्रशासनाला जाब विचारण्याची भूमिका घेण्यात आली. आदिवासी समाजाच्या सामाजिक, आरोग्य आणि शिक्षणाच्या प्रश्नांवरही चर्चा झाली. आदिवासी समाजाच्या जीवनावर आधारित चित्रपट निर्मितीसाठी आर्थिक पाठबळ मिळावे, याबाबतचा प्रस्तावही सभेत मांडण्यात आला. जल, जंगल, जमीन, रोजगार आणि संविधानिक अधिकारांवर परिणाम करणाऱ्या विविध प्रश्नांबाबत आदिवासी समाजाने अधिक संघटित होण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली. 'आपण केवळ नागरिक म्हणून राहायचे नाही, तर आपल्या हक्कांसाठी संघटित होऊन ठामपणे उभे राहायचे आहे,' असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# विक्रोळी टागोर नगरमध्ये दुकान फोडून चोरी; दोन आरोपी जेरबंद

## लॅपटॉप, मोबाईलसह संपूर्ण मुद्देमाल हस्तगत; ८७ हजारांचा चोरीचा माल जप्त

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**विक्रोळी - प्रतिनिधी**
**जितेंद्र गुप्ता**

**विक्रोळी :** टागोर नगर परिसरातील आरती इंटरप्रायजेस या दुकानाची खिडकी तोडून चोरी करणाऱ्या दोन आरोपींना विक्रोळी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. आरोपींकडून चोरीस गेलेला एचपी कंपनीचा लॅपटॉप, सॅमसंग मोबाईल, ४० मीटर कंट्रोल व्हॉल्व, २०० फ्लेक्स कोअर पाईप तसेच ३०० रायझर आयसोलेशन व्हॉल्व असा संपूर्ण मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. चोरीस गेलेल्या मुद्देमालाची एकूण




किंमत सुमारे ८७ हजार रुपये असल्याची माहिती आहे. या प्रकरणाचा पुढील तपास विक्रोळी पोलीस करीत आहेत.

# पुण्यात सीएनजीने ओलांडली शंभरी; प्रति किलो २ रुपयांनी दरवाढ, सर्वसामान्यांसह चालकांच्या खिशाला कात्री

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पुणे :** पेट्रोल आणि डिझेलच्या महागाईने होरपळणाऱ्या पुणेकरांना आता सीएनजीच्या (CNG) वाढत्या दरांचा दणका बसला आहे. पुणे शहरात सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ करण्यात आली असून, (बुधवार, ७ ऑक्टोबर २०२६) पासून हे नवे दर लागू झाले आहेत. या दरवाढीमुळे शहरातील सीएनजीच्या किमतीने अखेर १०० रुपयांचा टप्पा ओलांडला असून, नवा दर आता १०० रुपये ५० पैसे प्रति किलोवर पोहोचला आहे. कालपर्यंत हा दर ९८.५० रुपये इतका होता. 'टोरंट गॅस' (Torrent Gas) कंपनीने ही दरवाढ लागू केली असून, ६ ऑक्टोबरच्या मध्यरात्री १२ वाजल्यापासूनच सुधारित दर अमलात आल्याची माहिती पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल यांनी दिली आहे. त्यामुळे टोरंट गॅसच्या पंपांवर सीएनजी भरण्यासाठी



वाहनधारकांना आता प्रत्येक किलोमागे २ रुपये अधिक मोजावे लागणार आहेत.

**महिन्याचे बजेट कोलमडणार; सर्वसामान्यांमध्ये नाराजी**

पेट्रोल-डिझेलच्या तुलनेत स्वस्त आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून शहरातील लाखो नागरिकांनी तसेच व्यावसायिकांनी सीएनजी वाहनांकडे मोर्चा वळवला होता. मात्र, सातत्याने होणाऱ्या या दरवाढीमुळे वाहनचालकांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. अचानक झालेल्या या वाढीमुळे शहरातील हजारो ऑटो रिक्षाचालक, ॲप-आधारित कॅब चालक आणि खासगी वाहनधारकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

**प्रवास आणि मालवाहतूक महागण्याची भीती**

सीएनजीच्या दराने शंभरी पार केल्यामुळे आता वाहतूक खर्चही थेट वाढणार आहे. शहरातील मालवाहतूक करणाऱ्या लहान व्यावसायिक वाहनांचा खर्च वाढल्यास जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवरही त्याचा अप्रत्यक्ष परिणाम होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, इंधन दरवाढीमुळे त्रस्त झालेले रिक्षा व टॅक्सी चालक आगामी काळात भाडेवाढीची मागणी लावून धरू शकतात. त्यामुळे अंतिमतः सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशालाच आणखी कात्री लागणार आहे. प्रशासनाने आणि गॅस पुरवठादार कंपन्यांनी या वाढत्या किमतींवर तातडीने नियंत्रण आणावे, असा सूर आता पुणेकरांमधून उमटू लागला आहे.

(पान १ वरून ...☞)

## निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचा विषय ...

केला आहे.'

**क्युरेटिव्ह याचिका दाखल पण रिकॉलचा वेगळा अर्ज सादर**

जेव्हा सरन्यायाधिशांनी विचारलं की, दुसरा अंतरिम अर्ज देखील दाखल करण्यात आला आहे. त्यावर अधिवक्ते शंकरनारायणन यांनी सांगितलं की, क्युरेटिव्ह पेटिशन देखील दाखल करण्यात आली आहे. पण त्यांनी स्पष्ट केलं की, रिकॉल अर्ज हा त्यापेक्षा वेगळा आहे. याबाबत क्युरेटिव्ह याचिका आपल्या पद्धतीनं चालेल. ती सुनावणी योग्य आहे की नाही मला माहिती नाही. पण आमचा अर्ज निर्णय मागे घेण्यासाठीचा आहे. पण क्युरेटिव्हसाठी पुनर्पडताळणीची गरज असते.

# कृती समितीच्या दणक्याने सोनवडी बंधाऱ्याची दुरुस्ती सुरू

## प्रशासनाकडून कामास प्रत्यक्ष सुरुवात; कामाचा दर्जा व वेळेत पूर्ततेवर कृती समितीचे लक्ष

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पाटस - प्रतिनिधी
गणेश गावडे

**दौंड :** भीमा नदीवरील सोनवडी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यातील मोठ्या प्रमाणावरील पाणीगळती आणि गंजलेल्या लोखंडी प्लेट्सच्या समस्येवर अखेर प्रशासनाने पाऊल उचलले आहे. 'सोनवडी बंधारा बचाव व पाणी हक्क कृती समिती'ने दिलेल्या तीव्र आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल घेत प्रशासनाकडून ५ ऑक्टोबर रोजी बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.

दौंड, शिरूर आणि श्रीगोंदा या तीन तालुक्यातील शेतकरी व ग्रामस्थांसाठी सोनवडी बंधारा अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, बंधाऱ्याच्या जुन्या, गंजलेल्या आणि खराब झालेल्या लोखंडी प्लेट्समुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात होते. कृती समितीने प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून जुन्या प्लेट्स बदलणे, पाणीगळती रोखणे आणि आवश्यक दुरुस्ती तातडीने करण्याची मागणी केली होती.



### आंदोलनाबाबत पुढील निर्णय आढाव्यानंतर

दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने ६ ऑक्टोबरच्या नियोजित रस्ता रोको आंदोलनाबाबत प्रशासनाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेतला जाईल. दुरुस्तीचे काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यास आंदोलनाचा पुनर्विचार केला जाईल; मात्र कामात दिरंगाई किंवा निकृष्ट दर्जा आढळल्यास शेतकरी हक्कासाठी तीव्र पाठपुरावा व आंदोलनाची भूमिका कायम राहील, असा इशारा समितीने दिला आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सांगली–मनमाड मार्गावर सोनवडी येथील पवार व्हेज हॉटेलसमोर रस्ता रोको आंदोलन करण्याचा स्पष्ट इशारा कृती समितीने निवेदनाद्वारे दिला होता. या आंदोलनाच्या एक दिवस आधीच प्रशासनाने चक्रे हलवून ५ ऑक्टोबरला दुरुस्ती काम हाती घेतले. ही बाब शेतकरी आणि ग्रामस्थांच्या एकजुटीचा विजय मानली जात आहे.

कामाची सुरुवात झाल्याबद्दल 'सोनवडी बंधारा बचाव व पाणी हक्क कृती समिती'ने प्रशासनाचे स्वागत केले आहे. मात्र, केवळ काम सुरूकरणे पुरेसे नसून ते दर्जेदार, पूर्ण क्षमतेने आणि वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. विशेषतः जुन्या प्लेट्स बदलणे, रबरी पॅकिंग/सीलिंग करणे आणि पाणीगळतीवर कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक असल्याचे समितीने स्पष्ट केले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या मनात जाणवली शेतकऱ्यांची तळमळ

## जानवळ शिवारात जिल्हाधिकारी बांधावर

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
चाकूर - प्रतिनिधी
किशन वडारे

**चाकुर :** चाकुर तालुक्यातील जाणवळ येथे दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ भारत बास्टेवाड यांच्या पाहणी दरम्यान त्यांनी वडवळ आणि जानवळ या गावची पिकपाहणी व पाणीटंचाई यांची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा देत निसर्गाची अवकृपेने पावसाने पाठ फिरवल्याने खरीप व रब्बी हंगाम हातचा गेल्याने शेतकरयांची अवस्था बिकट झाली असून पाणीटंचाईचा सामना करण्याची दुर्दैवी वेळ आली असल्याची भावना व्यक्त करताना भावूक झाले.

चाकूर तालुक्यातील जानवळ जिल्हा परिषद गट हा डोंगराळ भाग असून या भागात पावसाने प्रदीर्घ दडी दिल्याने जानवळ शिवारातील खरीप हंगामातील सोयाबीन व तूर पिकांना मोठा फटका बसला आहे. अनेक शेतामध्ये सोयाबीनच्या शेंगा भरल्या नसून पोकळ राहिल्या आहेत. तर तुरीची वाढ खुंटली आहे. काही ठिकाणी उभी पिके



अक्षरशः करपून गेल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ भारत बास्टेवाड यांनी जानवळ शिवारातील पिकांची पाहणी करताना भावूक झाले, याबाबत उपस्थित बळीराजाशी बोलताना मी शेतकऱ्यांचा मुलगा असून निसर्गाच्या अवकृपेमुळे खरीप व रब्बी हंगाम हातचा गेल्याचं सांगताना भावूक झाल्याचे जानवले तसेच जानवळ गावच्या पाणीटंचाई बाबत चर्चा केली.

या पाहणी दौऱ्यात मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, उपविभागीय अधिकारी श्रीमती मंजुषा लटपटे, तहसीलदार नरसिंग जाधव, वडवळचे उपसरपंच बालाजी गंदगे, सुशील पाटील, गणेश जाधव व शेतकरी उपस्थित होते.

# सावरमाळ येथे ७ ऑक्टोबरला भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
प्रतिनिधी
मष्णाजी मरखेले

**सावरमाळ :** सावरमाळ येथे ग्रामीण भागातील गोरगरीब व गरजू रुग्णांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, सावरमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्र, सावरमाळ, ता. मुखेड, जि. नांदेड येथे होणार आहे. या शिबिरात अनुभवी व तज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग




आदी तपासणी व मोफत औषध वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमाचे प्रमुख आयोजक रामदास पाटील सोमठाणकर, व्यंकटराव पाटील गोजेगावकर, बाळासाहेब गीपाने, अमोल धामणे सावळीकर, श्रीकांत काळे शिबिराचा जास्तीत जास्त गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. शिबिराच्या यशस्वितेसाठी फाउंडेशनचे पदाधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत ले व शिबिर संपन्न केले आहे.

# जंगलातील पानवटे कोरडे; वन्यप्राण्यांची पाण्यासाठी वणवण

## चिखली, हिवरे, कोथाळे, सोहाळे, देगाव परिसरातील वनक्षेत्रात पाण्याची तीव्र टंचाई; पानवटे तातडीने भरून देण्याची मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मोहोळ - प्रतिनिधी

**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरे, कोथाळे, सोहाळे आणि देगाव परिसरातील वनविभागाच्या हद्दीतील जंगलात सध्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. जंगलातील अनेक पानवटे कोरडे पडल्याने वन्यप्राण्यांना पाण्यासाठी जंगलाबाहेर तसेच दूरवर भटकंती करावी लागत असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत असून, वनविभागाने तातडीने पानवटे भरून देण्याची मागणी नागरिक व वन्यजीवप्रेमींकडून करण्यात येत आहे. मोहोळ तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने



उन्हाळ्यानंतरही पाण्याची समस्या कायम आहे. ग्रामीण भागातील अनेक जलस्रोतांवर त्याचा परिणाम झाला असून, जंगलातील नैसर्गिक पाणवठेही कोरडे पडले आहेत.

चिखली, हिवरे, कोथाळे, सोहाळे आणि देगाव परिसरातील वनक्षेत्रात विविध प्रकारचे वन्यप्राणी वास्तव्यास आहेत. मात्र, जंगलातील पाण्याचे स्रोत आटल्याने या प्राण्यांना पाण्याच्या शोधात भटकावे लागत आहे.

पाण्याच्या शोधात वन्यप्राणी जंगलाबाहेर येण्याची शक्यता वाढली असून, त्यामुळे त्यांचा मानवी वस्त्यांशी संपर्क होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तसेच रस्ते ओलांडताना वाहनांच्या धडकेत वन्यप्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. पाण्यासाठी लांब अंतर कापावे लागल्याने वन्यप्राण्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत असल्याचेही वन्यजीवप्रेमींचे म्हणणे आहे.

**कृत्रिम पाणवठे भरण्याची गरज**

वनविभागाने जंगलातील उपलब्ध पानवटे आणि कृत्रिम पाणवठ्यांची तातडीने पाहणी करून तेथे नियमित पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे. टँकरद्वारे पाणवठे भरण्याचे नियोजन करून पाण्याची उपलब्धता कायम ठेवली तर वन्यप्राण्यांना जंगलातच पाणी मिळू शकते. त्यामुळे वन्यप्राण्यांची जंगलाबाहेर होणारी भटकंतीही काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. दरम्यान, पाण्याअभावी वन्यप्राण्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन वनविभागाने केवळ कागदोपत्री नियोजन न करता प्रत्यक्ष जंगलात जाऊन परिस्थितीची पाहणी करावी. चिखली, हिवरे, कोथाळे, सोहाळे आणि देगाव परिसरातील वनक्षेत्रातील पानवटे तातडीने भरून वन्यप्राण्यांची तहान भागवावी, अशी जोरदार मागणी नागरिक व वन्यजीवप्रेमींकडून होत आहे.

# शेतकऱ्यांना ८ तास पूर्ण दाबाने वीज द्या; राहुल कुल यांच्या सूचना

## सार्वजनिक उपक्रम समितीच्या बैठकीत महावितरणच्या कारभाराचा आढावा;
## शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नांसह सौर प्रकल्प व वीजवाहिन्यांबाबत महत्त्वपूर्ण निर्णयांवर चर्चा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
दौंड - प्रतिनिधी
अंकुश काळे

**दौंड :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण)च्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक समितीचे अध्यक्ष आ.राहुलदादा कुल यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन, मुंबई येथे पार पडली. या बैठकीत राज्यातील वीज वितरण व्यवस्था, वीजपुरवठ्याची सद्यस्थिती, पायाभूत सुविधांचा विकास आणि ग्राहक हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी दररोज किमान आठ तास पूर्ण दाबाने आणि तांत्रिक व्यत्ययाविना वीजपुरवठा मिळावा, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना राहुल कुल यांनी दिल्या. वीजपुरवठ्यातील तांत्रिक अडचणींमुळे पिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी महावितरणने वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर द्यावा, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देताना नवीन सोलर पार्क उभारण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांवर कोणतीही सक्ती करूनये, त्यांच्या जमिनी व हक्कांचा आदर राखून संपूर्ण प्रक्रियेत त्यांना विश्वासात घेण्यात यावे, अशी सूचना करण्यात आली. तसेच महावितरणकडून शेतातून किंवा स्थानिक परिसरातून नवीन वीजवाहिन्या, खांब अथवा टॉवर उभारणीची कामे करताना संबंधित शेतकऱ्यांशी पूर्वसंवाद साधावा. त्यांच्या अडचणी समजून घेऊन योग्य समन्वयाने आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच ही कामे मार्गी लावावीत, असे निर्देश देण्यात आले. महावितरणचे कामकाज अधिक लोकाभिमुख आणि पारदर्शक करण्याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या वीजविषयक प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. बैठकीस ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, प्रकल्प संचालक सचिन तालेवार, वित्त संचालक अनुदीप दिघे, वाणिज्य संचालक योगेश गडकरी, संचालन संचालक धनंजय औंढेकर, कार्यकारी अभियंता अंकुर कानडे तसेच समितीचे सदस्य आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार भीमराव तापकीर, आमदार रईस शेख आणि आमदार हेमंत ओगले उपस्थित होते.

# डिकसळमध्ये कचऱ्याचे साम्राज्य; सात दिवसांत स्वच्छता न झाल्यास ग्रामपंचायतीसमोर कचरा टाकण्याचा इशारा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
धाराशिव - प्रतिनिधी
समीर मुल्ला

**धाराशिव :** डिकसळ ग्रामपंचायत हद्दीतील गणेशनगर, सम्राट अशोकनगर, एकतानगर, फरीदनगर, एस.टी. कॉलनी तसेच ढोकी रोड परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. कचऱ्याची नियमित उचल होत नसल्याने विविध ठिकाणी कचऱ्याचे ढीग निर्माण झाले असून दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

गावातील रहिवासी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असतानाही त्याची नियमित साफसफाई व उचल होत नसल्याने ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः वस्ती परिसरात साचलेल्या कचऱ्यामुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

या गंभीर समस्येची तातडीने दखल घेण्याची मागणी करत ग्रामपंचायत सदस्य इम्रान हाजी नजमोद्दीन मुल्ला, मुबीन बशीर मनियार तसेच दयावान प्रतिष्ठानचे सचिव अभय गायकवाड यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदन दिले आहे. निवेदनासोबत कचरा साचलेल्या विविध ठिकाणांची छायाचित्रेही जोडण्यात आली आहेत.

गणेशनगर, सम्राट अशोकनगर, एकतानगर, फरीदनगर, एस.टी. कॉलनी आणि ढोकी रोड परिसरातील कचरा तातडीने उचलावा, संबंधित परिसराची स्वच्छता करावी तसेच गोळा झालेल्या कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



**'सात दिवसांत स्वच्छता करा; अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर कचरा आणू'**

डिकसळमधील विविध भागांत साचलेल्या कचऱ्याची तात्काळ उचल करून परिसर स्वच्छ करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास सात दिवसांनंतर ग्रामपंचायत कार्यालयासमोर कचरा आणून प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवू,

इम्रान हाजी नजमोद्दीन मुल्ला
ग्रामपंचायत सदस्य डिकसळ
दयावान प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष

केवळ तात्पुरती स्वच्छता मोहीम राबवून प्रश्न सोडविण्याऐवजी ग्रामपंचायतीने कचरा संकलनाची नियमित आणि प्रभावी व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांनी घरातील कचरा योग्य ठिकाणी देणे ही त्यांची जबाबदारी असली तरी ग्रामपंचायतीने तो कचरा वेळेवर उचलून त्याची योग्य विल्हेवाट लावणेही तितकेच आवश्यक आहे.

गावातील विविध भागांत वारंवार कचऱ्याचे ढीग साचत असतील, तर त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी नागरिक आणि ग्रामपंचायत प्रशासन या दोन्ही घटकांनी आपापली जबाबदारी पार पाडणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

**सात दिवसांची मुदत; अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर कचरा**

ग्रामपंचायत प्रशासनाने संबंधित भागातील संपूर्ण कचरा सात दिवसांच्या आत उचलून परिसर स्वच्छ करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मुदतीत स्वच्छता करण्यात आली नाही, तर नागरिकांच्या वतीने विविध ठिकाणी साचलेला कचरा ग्रामपंचायत कार्यालयासमोर आणून टाकण्यात येईल आणि प्रशासनाच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असलेल्या या प्रश्नाकडे ग्रामपंचायत प्रशासनाने गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

# कोटबाजार शिवारात महसूल-कृषी प्रशासनाकडून दुष्काळी परिस्थितीचा आढावा; पिकांची प्रत्यक्ष पाहणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कंधार - प्रतिनिधी

**कंधार :** यंदाच्या खरीप हंगामात पावसाने मोठी ओढ दिल्याने शेतकऱ्यांसमोर संकट उभे राहिले आहे. पावसाअभावी पिकांच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने दुष्काळ जाहीर केला असून, कंधार तालुक्यात महसूल प्रशासनाकडून दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पीक पाहणीची मोहीम सुरूकरण्यात आली आहे.

याच अनुषंगाने मंगळवार, ६ ऑक्टोबर रोजी कोटबाजार शिवारातील विविध पिकांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. महसूल व कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शेतशिवारात जाऊन पिकांची स्थिती बारकाईने पाहिली. पावसाचे प्रमाण, पिकांची वाढ, जमिनीतील ओलावा तसेच पावसाअभावी पिकांवर झालेला परिणाम याबाबत प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.



**पावसाअभावी खरीप पिकांना फटका**

कंधार तालुक्यात यंदा समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. सुरुवातीला झालेल्या पावसानंतर शेतकऱ्यांनी पेरणी केली; मात्र त्यानंतर पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने अनेक ठिकाणी पिकांची वाढ अपेक्षित प्रमाणात झालेली नाही. काही भागांत पिके कोमेजण्याची स्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

दुष्काळ जाहीर झाल्यानंतर प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या या पीक पाहणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची स्थिती जाणून घेऊन नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करावे, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

**अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष शेतशिवाराची पाहणी**

कोटबाजार येथे झालेल्या पाहणीदरम्यान महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. दुष्काळामुळे शेतीवर निर्माण झालेल्या अडचणी, पिकांचे नुकसान आणि अपेक्षित उत्पादन याबाबतही माहिती घेण्यात आली. प्रशासनाच्या पाहणीमुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी तलाठी परशुराम जाधव, सहाय्यक कृषी मंडळ अधिकारी अनुसया केंद्रे, ग्रामसेवक अमृत मंगनाळे, सरपंच मोहम्मद अजीमोद्दीन, पोलीसपाटील प्रतिनिधी मिर्झा यादुल बेग, शेख इमरोज, मोहम्मद नसीरोद्दीन, मिर्झा सैफ बेग, सत्तार बेग यांच्यासह शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

कंधार तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाकडून सुरू असलेली पीक पाहणी, नुकसानीची नोंद आणि वस्तुनिष्ठ अहवालाची प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची ठरणार आहे. शासनाच्या निकषानुसार पात्र शेतकऱ्यांना दुष्काळी मदत, सवलती आणि इतर योजनांचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# इंडीया आघाडीचा नांदेड येथे महामोर्चा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी
प्रा.विजयकुमार दिग्रसकर

**नांदेड :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धती आणि मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षणावरून सुरू असलेल्या विवादाच्या निषेधार्थ इंडिया आघाडीचा नांदेड येथे महामोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे सर्वच नेते,पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. यात प्रामुख्याने विद्यमान खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर ,माजी आमदार बेटमोगरेकर, माजी सनदी अधिकारी अनिल मोरे, कंधार काँग्रेस चे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर, माजी आमदार रोहिदास चव्हाण, नांदेड उत्तर काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**ज्ञानेश हटाव देश बचाव**



# रामतीर्थ येथील घरकुलांच्या मस्टर व मजुरीत अनियमिततेचा आरोप

**संबंधित रोजगार सेवकाची चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाईची मागणी**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी
सुरेश ज्ञा. दवणे



**मंठा :** तालुक्यातील रामतीर्थ, येथील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांच्या मस्टर व मजुरीच्या नोंदीमध्ये अनियमितता होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित ग्राम रोजगार सेवकाची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवश्री एकनाथ कैलास जाधव यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती मंठा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनानुसार, काही घरकुल लाभार्थ्यांचे मस्टर वेळेवर न काढणे, प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या तुलनेत अर्धवट मस्टर काढणे तसेच मजुरीच्या नोंदीमध्ये चुकीची नावे टाकल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या मजुरीपासून वंचित राहण्याची अथवा मजुरी मिळण्यास विलंब होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच लाभार्थ्यांकडून मस्टर क्रमांक, कामाचे दिवस, मंजूर मजुरी, FTO/देयकाची स्थिती व खात्यावर जमा झालेल्या रकमेची माहिती मागितली असता संबंधित रोजगार सेवकाकडून माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

या प्रकरणाची सत्यता तपासण्यासाठी रामतीर्थ गावातील संबंधित कालावधीतील सर्व मस्टर रोल, ई-मस्टर, जॉब कार्ड, ऑनलाइन नोंदी, उपस्थिती, मजुरीची रक्कम, FTO व बँक खात्याशी संबंधित नोंदींची सखोल तपासणी करावी. तसेच लाभार्थ्यांचे प्रत्यक्ष जबाब घेऊन नोंदींची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीत आरोप सत्य आढळल्यास संबंधित रोजगार सेवकावर नियमानुसार कठोर कारवाई करावी तसेच चुकीच्या नोंदीमुळे लाभार्थ्यांची मजुरी प्रलंबित असल्यास ती तातडीने मिळवून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# होय आपण सगळे मिळून क्षय मुक्त ग्रामपंचायत करु शकतो...

## जिल्हा क्षयरोग अधिकारी यवतमाळ,... - डॉ विशाल धांडे

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**यवतमाळ :** राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमा अंतर्गत क्षयरोगाचे लवकरात लवकर निदान करून क्षय रुणाला प्रभावी ऊपचारा खाली आणावे असे आवाहन डॉ विशाल धांडे जिल्हा क्षयरोग अधिकारी यांनी केले. तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून देश क्षयरोग मुक्त करण्याचे धेय निश्चित करण्यात आले आहे. माननीय पंतप्रधान यांनी केलेल्या क्षयरोग मुक्त भारत या आव्हानाला प्रतिसाद देऊन ग्रामीण भागातील शेवटच्या नागरिका पर्यंत या अभियानाचा संदेश पोहचवण्यासाठी ग्रामपंचायत ची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक ग्रामपंचायतीना GPDP मध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत करण्यासाठी मा सरपंच यांनी विविध उपाय योजना कराव्यात जसे की पत्रिका वाटने, शालेय विद्यार्थी यांची प्रभातफेरी काढने, भिंती वर क्षयरोगाचे बॅनर, क्षयरोग लक्षणे ईत्यादी माहिती द्यावी. प्रत्येक गावात टि. बी. स्क्रिनिंग कॅम्प घ्यावे, इत्यादी. तसेच चालू असलेल्या LCDC सर्वेक्षण करताना सर्व आरोग्य कर्मचारी यांनी गावातील मंडळींना सर्व माहिती द्यावी असे डॉ विशाल धांडे जिल्हा क्षयरोग अधिकारी यवतमाळ यांनी सांगितले.

# देऊळगाव गाडा येथे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धांचा उत्साह

## कांचनताई कुल यांच्या हस्ते बक्षीस वितरण; विद्यालयासाठी ५ लाखांचा निधी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
दौंड - प्रतिनिधी
अंकुश काळे



**दौंड :** क्रीडा व युवक कल्याण संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा २०२६-२७ देऊळगाव गाडा येथील सद्गुरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात उत्साहात पार पडल्या. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास कांचनताई कुल उपस्थित होत्या. त्यांनी स्पर्धेतील विजेत्या तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. दरम्यान, आमदार राहुलदादा कुल यांच्या प्रयत्नातून सद्गुरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भौतिक व शैक्षणिक सुविधांच्या विकासासाठी मंजूर झालेल्या ५ लाख रुपयांच्या निधीचा धनादेश संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. नामदेव नाना बारवकर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. यावेळी मा. संचालक संजय भाऊ इनामके तसेच केडगाव येथील जवाहरलाल विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य मुकुंद भिसे सर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. कांचनताई कुल यांनी दोघांनाही वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# कापूस उत्पादकांच्या नुकसानीची जानकरांकडून पाहणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पैठण - प्रतिनिधी
तुषार नाटकर



✻ दावरवाडी शिवारात शेतकऱ्यांशी संवाद
✻ हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाईची मागणी

**छ. संभाजीनगर (पैठण) :** पैठण तालुक्यातील दावरवाडी शिवारात अस्मानी संकटामुळे कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा दावा शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी बुधवारी (ता. ७) दावरवाडी शिवारातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन नुकसानीची पाहणी केली. दावरवाडी शिवारातील अशोक सरगर यांच्या शेतात जाऊन जानकर यांनी कापूस पिकाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकाची स्थिती, झालेला खर्च आणि नुकसानीबाबत माहिती घेतली. अस्मानी संकटामुळे कापूस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याचे त्यांनी सांगितले. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी करत हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी आग्रही भूमिका जानकर यांनी मांडली. पाहणी दौरा पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या विविध मागण्या मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मांडणार असल्याचेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून त्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे आवश्यक असल्याचे यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत राष्ट्रीय समाज पक्षाच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे जानकर यांनी स्पष्ट केले. यावेळी अजित पाटील, माऊली सलगर, ओमप्रकाश चितळकर, अश्रुबा कोळेकर, प्रकाश दिलवाले, जिल्हाध्यक्ष अशोक सरगर, कृष्णा जाधव, भाऊसाहेब सोनवणे, संतोष सोनवणे, शिवाजी जाधव, सचिन जाधव, किशोर जाधव, गणेश भुजबळ, महेश दिलवाले, सोपान महालकर, ओमकार राजळे, रामेश्वर सोरमारे, दत्ता चोरमारे, दत्ता दिवटे, मिठू चोरमले, मिठू नन्नवरे, गोपाल धारे, शेखर धारे, विष्णू सोरमारे, अंबादास खोलासे, किशोर डोईफोडे यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दौंड तालुका १००% दुष्काळात, मग पंचनाम्यांचा खटाटोप कशासाठी?

**अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या फोन टाळाटाळीने शेतकरी त्रस्त!**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पाटस - प्रतिनिधी
गणेश गावडे

**पाटस :** दौंड तालुक्यात दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून अनेक भागांत पाण्याअभावी पिके जळू लागली आहेत. संपूर्ण तालुका दुष्काळग्रस्त परिस्थितीत असताना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करण्यासाठी पुन्हा शेतकऱ्यांनाच कागदपत्रे गोळा करून शासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागत असल्याने शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. यातच भर म्हणजे, अडचणीच्या काळात मार्गदर्शन मिळवण्यासाठी किंवा माहिती घेण्यासाठी ग्रामस्थांनी संपर्क साधल्यास स्थानिक पातळीवरील सरकारी अधिकारी, जबाबदार घटक आणि ग्रामपंचायतीचे कर्मचारी फोन उचलत नाहीत. या सर्वांच्या अशा टाळाटाळीच्या भूमिकेमुळे आणि निष्काळजीपणामुळे सामान्य ग्रामस्थांच्या अडचणीत आणखीनच भर पडली आहे.

पंचनामा करण्यासाठी सातबारा, पीक पाहणीसह विविध कागदपत्रे आणण्याचे आदेश शेतकऱ्यांना दिले जात आहेत. या प्रक्रियेसाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना प्रवास, कागदपत्रे आणि इतर बाबींवर २००० ते ३००० रुपयांपर्यंत अतिरिक्त खर्च येत असल्याचा दावा शेतकऱ्यांकडून केला जात आहे. एकीकडे पिके पाण्याअभावी व उन्हामुळे जळत असताना दुसरीकडे पंचनाम्यासाठी होणारा हा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरत असल्याची भावना निर्माण झाली आहे.

संबंधित सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन परिस्थितीची पाहणी करणे अपेक्षित असताना, ते कार्यालयात बसूनच शेतकऱ्यांकडून कागदपत्रे मागत असल्याच्या तक्रारी आहेत. 'फोटो आणा, सातबारा आणा' असे सांगून शेतकऱ्यांना कार्यालयात बोलावले जात असल्याने ही पंचनाम्याची प्रक्रिया नक्की कोणासाठी आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. त्यातच स्थानिक पातळीवर सरकारी अधिकारी आणि कर्मचारी संपर्कात राहत नसल्याने, फोन न उचलल्याने कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे, पंचनाम्याची मुदत काय आहे याबाबत कोणतीही अचूक माहिती ग्रामस्थांना मिळत नाही. कार्यालयात किंवा ग्रामपंचायतीत फेऱ्या मारूनही संपर्क होत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

शेतकरी उन्हातानात शेतात राबत असताना नुकसानग्रस्त पिकांची प्रत्यक्ष पाहणी करण्याऐवजी कार्यालयात बसून पंचनामे स्वीकारले जात असतील, तर प्रशासनाची जबाबदारी नेमकी काय, असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. त्यामुळे दौंड तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सरसकट पंचनामे करण्याची मागणी जोर धरत आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी गावोगावी जाऊन प्रत्यक्ष शेतांची पाहणी करावी, फोन न उचलणाऱ्या आणि जनतेला वेठीस धरणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ प्रशासनाने कडक कारवाई करावी, तसेच नुकसानग्रस्त पिकांचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांवर कोणताही अनावश्यक आर्थिक भार पडू देऊ नये, अशी आग्रही मागणी आता शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

# नेहरूनगर न्यायालय परिसरातील कोंडीवर दुहेरी उपाययोजना

## पार्किंगसह नोटरी वकिलांसाठी स्वतंत्र जागेची पाहणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पिंपरी - प्रतिनिधी



**बार असोसिएशनच्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद; अण्णासाहेब मगर स्टेडियम मधील मोकळ्या जागेच्या वापराचा पर्याय**

**पिंपरी :** नेहरूनगर न्यायालय परिसरातील अपुरी पार्किंग व्यवस्था, वाढती वाहतूक कोंडी आणि रस्त्याच्या दुतर्फा नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांच्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. अण्णासाहेब मगर स्टेडियमच्या आतील बाजूस उपलब्ध मोकळ्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात वाहनतळाची व्यवस्था करण्यासह नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांसाठी स्वतंत्र, सुसज्ज जागा उपलब्ध करून देण्याच्या पर्यायाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

महापौर रवी लांडगे, क प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे आणि क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे-पाटील यांच्याकडे बार असोसिएशनने निवेदनाद्वारे या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर क प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे आणि क क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे-पाटील यांनी अण्णासाहेब मगर स्टेडियम तसेच नेहरूनगर न्यायालय परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी स्टेडियमच्या आतील बाजूस पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देण्याबरोबरच नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांसाठी प्रशस्त प्रवेशद्वारासह स्वतंत्र व सुसज्ज जागा निर्माण करण्याबाबत चर्चा झाली. नेहरूनगर न्यायालयात सुमारे २ हजार नोंदणीकृत वकील असून दररोज सुमारे ३,५०० हून अधिक प्रकरणांचे कामकाज चालते. याशिवाय सुमारे २ हजार पक्षकार, नागरिक आणि पोलीस कर्मचारी विविध कामांसाठी न्यायालयात ये-जा करतात. एवढ्या मोठ्या प्रमाणातील दैनंदिन वर्दळीच्या तुलनेत न्यायालयाच्या बेसमेंटमधील पार्किंगची उपलब्ध जागा अत्यंत अपुरी आहे. त्यातच बेसमेंटमध्ये पाणी साचण्याच्या समस्येमुळे उपलब्ध पार्किंग व्यवस्थेवरही मर्यादा येत आहेत. परिणामी वकील, पक्षकार आणि नागरिकांना रस्त्यावर वाहने उभी करावी लागत असून, न्यायालय परिसरासह विठ्ठलनगर आणि लगतच्या भागात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. स्थानिक रहिवाशांनाही या कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत असून, किरकोळ अपघातांच्या घटनांची शक्यताही वाढली आहे.

नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांनाही रस्त्याच्या दुतर्फा काम करावे लागत असल्याने पादचारी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे पार्किंगसोबतच नोटरी वकिलांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देणे हा वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीनेही महत्त्वाचा उपाय ठरणार आहे.

पाहणीवेळी पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे विद्यमान सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रिना मगदूम, माजी सचिव ॲड. धनंजय कोकणे, सदस्य ॲड. संकेत सरोदे, ॲड. राजेश राजपुरोहित, ॲड. विकास शर्मा त्याचबरोबर प्रभाग क्रमांक ९ मधील फारुख इनामदार, कमलेश वाळके, शंकर उबाळे यांच्यासह वकील बांधव व नागरिक उपस्थित होते.

प्रतिक्रिया : 'वकील, पक्षकार आणि नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी पार्किंग व नोटरीसाठी नियोजनबद्ध व्यवस्था होणे गरजेचे आहे. प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, त्याची लवकर अंमलबजावणी व्हावी, ही अपेक्षा आहे.'
- ॲड. उमेश खंदारे, सचिव, पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन

# हे तुम्हांला माहिती आहे का ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

१. मानवी DNA मध्ये इतकी माहिती साठवलेली असते की ती ३ अब्ज अक्षरांची पुस्तकांची मालिका होईल.
२. जगातील सर्वात वेगवान सुपरकंप्युटर (Fugaku, जपान) एका सेकंदात ४४२ क्वाड्रिलियन गणना करू शकतो.
३. पृथ्वीवरील प्रत्येक माणसाला जर मेंदूतील सर्व न्यूरॉन्स जोडणारे वायर लांबीने मोजले, तर ते ४,५०,००० किमी म्हणजे पृथ्वीला ११ वेळा वेढू शकतील.
४. रोबोटिक्समध्ये वापरले जाणारे अख अल्गोरिदम्स आता स्वतः शिकून नवीन कामे करतात, ज्याला 'रीइन्फोर्समेंट लर्निंग' म्हणतात.
५. इंटरनेटवर दररोज ५०० कोटींपेक्षा जास्त ई-मेल्स पाठवले जातात.
६. पहिला मोबाईल फोन (१९७३, Motorola) जवळपास १.१ किलो वजनाचा होता.
७. मानवी हृदय एका दिवसात तयार करत असलेली विद्युत ऊर्जा इतकी असते की एक छोटा बल्ब सतत पेटता राहील.
८. जगातील पहिले 3D प्रिंटेड घर आता भारतातही बांधले जात आहे.
९. 'क्वांटम संगणक' पारंपरिक संगणकांपेक्षा लाखो पट जलद काम करू शकतो, कारण तो क्युबिट्स वर चालतो.
१०. जगातील पहिली इलेक्ट्रिक कार १८२८ मध्ये तयार झाली होती.
११. 'ब्लॅक होल' इतका शक्तिशाली असतो की त्यातून प्रकाशसुद्धा बाहेर पडू शकत नाही.
१२. २०२० मध्ये NASA ने मंगळावर पहिल्यांदाच हेलिकॉप्टर (Ingenuity) उडवले.
१३. आपल्या मेंदूत ८६ अब्ज न्यूरॉन्स आहेत, आणि प्रत्येक न्यूरॉन हजारो कनेक्शन करतो.
१४. पृथ्वीवर रोज पडणाऱ्या वीजेची (Lightning) ऊर्जा पुरेशी आहे की ती संपूर्ण जगाला काही दिवस वीज देऊ शकेल.

**✻ टीप : वरील माहितीची दैनिक चालु वार्ता वृत्तपत्र कोणत्याही प्रकारे पुष्टी करत नाही**

# ✻ प्रेरणादायी गोष्ट ✻

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

## मेहनती मुंगी



एका शेतात मुंग्यांचा एक मोठा समूह राहत होता. पावसाळा जवळ येत होता. सगळ्या मुंग्या दिवसभर धान्याचे कण गोळा करत होत्या.

एक लहानशी मुंगी मात्र थकली आणि विचार करू लागली – 'इतकं कशाला काम करायचं? अजून पाऊस आलाच नाही. थोडं आराम करू या.'

पण इतर मुंग्यांनी तिला समजावलं –

'आजची मेहनत उद्याच्या सुरक्षिततेसाठी आहे. आज आराम केलास तर उद्या उपाशी राहशील.' लहान मुंगीने त्यांचं ऐकलं, काम केलं, आणि पावसाळा आल्यावर सगळ्या मुंग्या सुखाने अन्न खात राहिल्या.

तेव्हा त्या मुंगीला कळलं की 'सतत मेहनत करणं हेच खरी शहाणपणाची गोष्ट आहे.'

**✻ तात्पर्य :**

'आजची मेहनत उद्याच्या आयुष्याला सुरक्षित आणि आनंदी बनवते.'

This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)




**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

कधीकधी अचानक रक्तस्राव होतो. शस्त्रक्रिया, बाळंतपणातील अतिरक्तस्राव, अपघात, इ. प्रसंगात बाहेरून रक्त देण्याची गरज निर्माण होते. जास्त प्रमाणात रक्तपांढरी असेल तर रक्त भरावे लागते. रक्ताचा कर्करोग, सर्पदंशातील रक्तस्राव, इत्यादी प्रसंगीही रक्त द्यावे लागते. एखादा आटोक्यात न येणारा जंतुदोषही योग्यायोग्यविचार करून रक्त दिल्यावर आटोक्यात येऊ शकतो. हिमोफिलिया व थॅलसीमिया या आजारात वारंवार रक्त भरावे लागते. रक्तदान हे या दृष्टीने खरेच जीवदान आहे. रक्तदान करणारी व्यक्ती निरोगी असणे आवश्यक आहे. यासाठी रक्तद्रव्याचे प्रमाण निदान १० ग्रॅम च्या वर असावे. तसेच गेल्या सहा महिन्यांत कावीळ किंवा विषमज्वर झालेला नसावा. एड्स व सांसर्गिक आजार नाही याची खात्री करावी लागते. मात्र तरीही एड्सचा धोका पूर्णपणे टळत नाही. यानंतर अशा व्यक्तीचे सुमारे २५० मि.ली. रक्त काढून घेतले जाते. लगेच गरज नसेल तर ते ४ सेंटीग्रेड तपमानात थंड ठेवले जाते. गरज पडेल तेव्हा हे रक्त शरीराच्या तपमानाच्या जवळआणून योग्य गटाच्या व्यक्तीला देण्यात येते.रक्तदानाबद्दल लोकांच्या मनात फार भीती आहे. पण ही भीती पूर्णपणे अनाठायी आहे. शरीरातल्या एकूण रक्ताच्या फक्त पाच टक्के रक्त काढले जाते. शस्त्रक्रियेच्या वेळी बरेच नातेवाईक रक्तदानास घाबरतात. अपरिचित व्यक्तीकडून रक्तदानातून काही सांसर्गिक आजार पसरण्याची शक्यता असते.(कावीळ, एड्स, इ.) या धोक्यामुळे आता व्यावसायिक रक्तदात्यांकडून रक्त घेतले जात नाही. आता रक्तदान शिबिरातून रक्त गोळा केले जाते.चुकीच्या गटाचे रक्त भरले गेले तर रक्त गोठण्याची क्रिया चालू होऊन मृत्यू येण्याची शक्यता असते. अशा रुग्णाला सुरुवातीस थोडे रक्त गेल्यानंतर लगेच थंडी वाजणे,अस्वस्थता, मळमळ, उलटी,इत्यादी त्रास होतो. त्यानंतर छाती, कंबर यांत वेदना चालू होते. नाडी आणि श्वसनाचा वेग वाढतो. रक्तदाब कमी कमी होत जातो आणि रुग्ण दगावण्याची शक्यता असते. रुग्ण वाचला तर काही वेळाने कावीळ होते. लघवीत लालसरपणा उतरतो (रक्तद्रव्य). कदाचित मूत्रपिंडाचे कामकाज बंद पडू शकते. लवकर निदान झाले तर धोका टाळणे शक्य असते.

**थँक्यू फॉर सेव्हिंग माय लाइफ : रक्तदाता सुखी भव:**

आज १४ जून जागतिक रक्तदाता दिन. ऑस्ट्रेलियातील डॉ. कार्ल लॅंडस्टेनर यांनी सव्वाशे वर्षांपूर्वी मानवी रक्तगटाचा शोध लावला, जागतिक आरोग्य संघटनेकडून हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून जगात साजरा केला जातो. रक्तदात्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. जे लोक ऐच्छिक रक्तदान करून जीवनदान करतात त्यांचे आभार मानणे व नवीन लोकांना रक्तदानासाठी प्रवृत्त करणे असे या दिवसाचे उद्दिष्ट ठरवलेले आहे.

**द्रव्यदानं परम दानम ।। अन्नदानं ततोधिकम ।। ततः श्रेष्ठ रक्तदानम**

आज धकाधकीच्या बऱ्याच ठिकाणी छोट्या मोठ्या अपघातात ऑपरेशनच्या वेळी रक्ताची मोठ्या प्रमाणावर गरज असते. त्यावर रक्तदान हाच एक उपाय आहे ओणि तो आपणासारखा सूज्ञ नागरिकच करूशकतो. आजच्या दिनी कोणतीही अपेक्षा न करता दर तीन महिन्यास मी रक्तदान करेन, असा संकल्प युवकांनी करावा.रक्तदान कोण करूशकते रक्तदानामुळे काहीही त्रास होत नाही. सुदृढ, सशक्त, रोग न झालेला माणूस रक्तदान करूशकतो. वयाच्या १८ व्या वर्षापासून ६० व्या वर्षापर्यंत रक्तदान करता येते. रक्तदानानंतर कोणतेही कष्टाचे काम करू शकतो. रक्तदातचे वजन ४५ किलोच्या वर असावे. रक्तदाताच्या रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण १२.५ असावे. नाडीचे ठोके ८० ते १०० असावेत.? तुम्ही रक्तदान करण्यास पात्र आहात कि नाही? ते या गोष्टी सांगतील.रक्तदान म्हणजे सर्वात श्रेष्ठ दान असते.आपले रक्त दान करून एखाद्याचा जीव वाचवण्याइतके पुण्याचे काम दुसरे कुठले नाही.आज जगात रोज लाखो लिटर रक्ताची रुग्णांसाठी आवश्यकता भासत असते.जर आपण यात काही मिली रक्त दान करून छोटेसे योगदान केले तर लाखमोलाचे ठरते. या आधीच्या लेखांमधून आपण रक्तदान करण्याचे फायदे तर बघितलेच आहेत.आपल्या प्रत्येकालाच आयुष्यात कधी न कधी रक्तदान करण्याची इच्छा होत असते त्यासाठी आपण कित्येक शिबिरे देखील घेत असतो.पण प्रत्येक व्यक्ती रक्त दान करू शकतोच असे नाही. रक्त दान करताना रक्तदात्यासाठी काही नियम बनविलेले असतात. जर तुम्ही त्या नियमांत पात्र असाल तरंच तुम्ही रक्त दान करू शकता. चला जाणून घेऊयात ते नियम.तुम्हाला जर रक्त दान करायची इच्छा असेल तर तुमचे वय १८ ते ६५ वर्षे दरम्यान असेल पाहिजे. जर तुमचे वजन ४५ किलो पेक्षा जास्त असेल तरच तुम्ही रक्तदान करण्यास पात्र आहात. तसेच तुमच्या शरीरातील रक्ताची पातळी अर्थात हिमोग्लोबिनचे प्रमाण १२.५ % पेक्षा जास्त असेल तरच तुम्ही रक्त दान करूशकता. जेवणानंतर आपल्या रक्तात साखर तयार होत असते त्यामुळे ज्या व्यक्तीला रक्तदान करायचे असेल त्या व्यक्तीला उपाशीपोटी रक्त दान करावे लागते. कारण एकदा का रक्तात साखर तयार झाली तर ते रक्त दान करण्यासाठी अयोग्य ठरते. चांगल्या आरोग्यासाठी प्रत्येक माणसाला दररोज आठ तास झोप घेणे आवश्यक असते.जर तुमची रक्त दान करण्याच्या अगोदर पूर्ण झोप झाली असेल तरच तुम्ही रक्तदान करूशकता. प्रत्येक रक्तदात्याला रक्तदान एका वर्षातून तीन वेळाच करता येते त्यामुळे रक्तदात्याने पूर्वी केलेल्या रक्तदानास तीन महिने पूर्ण झालेले असलेच पाहिजेत. जर तुम्हाला रोज कोणत्याही आजारावरची औषधे चालू असतील तर तुम्ही कधीही रक्त दान करू शकत नाही. जर तुम्हाला कधी कावीळ झाली असेल तर तुम्ही रक्त दान करण्यास अपात्र आहात. रात्रीतून वारंवार घाम येणे,कारणाशिवाय वजनात घट होणे, कमी न होणारा ताप, जुलाब, ग्रंथीची सूज अशी लक्षणे तुम्हाला जाणवत असतील तरी देखील तुम्ही रक्त दान करू शकत नाही.जेव्हा रक्तात अल्कोहोल मिसळते तेव्हा ते रक्त दूषित होते त्यामुळे रक्त दान करणाऱ्या व्यक्तीने रक्तदान करायच्या चोवीस तास आधी मद्यपान केलेले नसावे. जर तुम्ही रक्त दान करण्याच्या वर्षभर अगोदर कोणती लस घेतली असेल तरी तुम्ही रक्तदान करण्यास पात्र ठरत नाही. कर्करोग, हृदयरोग, रक्तस्त्राव जन्य व्याधी, विनाकारण वजनात घट, क्षय, रक्ताच्या इतर व्याधी, दमा, फिट येणे, अपस्मार, महारोग,

मानसिक असंतुलन, ग्रंथीच्या व्याधी, संधिवात, रक्तदाब असे आजार जर तुम्हाला असतील तर तुमचे रक्त दुसऱ्या रुग्णाला देणे धोकादायक ठरू शकते. म्हणून असे आजार असणाऱ्या व्यक्ती रक्त दान करण्यास कायमस्वरूपी अपात्र असतात. जर तुमचे मूल एक वर्षांपेक्षा लहान मुलं असेल, गेल्या सहा महिन्यात तुमचा गर्भपात झाला असेल, जर तुमची मासिक पाळी चालू असेल, किंवा मासिक पाळी चालू होऊन पाच दिवस पूर्ण न झालेल्या स्त्रीया देखील रक्त दान करण्यास तात्पुरत्या अपात्सतात.रक्तदानाचे हे नियम नक्की वाचा आणि मगच रक्तदान करून एका जीवाला पून्हा जीवदान द्या.रक्तदानाचा जरा समोरच्या वक्तीला फायदा होतो तसाच फायदा रक्तदात्यालाही होतो. शरीरात नवीन रक्त तयार व्हायला मदत होते. रक्तदान करणा?या व्यक्ती या इतरांपेक्षा जास्त स्वतःच्या आरोग्याची काळजी घेतात. पण रक्तदान करताना ठराविक गोष्टींची जर काळजी घेतली गेली नाही तर आरोग्यावर त्याचा वाईट परिणाम होतो. रक्तदानाबद्दल अनेकांच्या मनात आजही अनेक शंका असतात. आज आम्ही तुमच्या याच शंकेचं निरसन करणार आहोत. रक्तदान करण्यापूर्वी आणि केल्यानंतर काय करावं याबद्दल आज आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत. स्वस्थ पुरुष तीन महिन्यांतून एकदा रक्तदान करु शकतो. तर स्वस्थ महिला चार महिन्यांतून एकदा रक्तदान करु शकतात. महिला आणि पुरुषांच्या रक्तदान करण्यामध्ये फरक असण्याचं मुख्य कारण म्हणजे दोघांच्या शरीराची जढण वेगळी आहे. मासिकपाळीमुळे महिलांच्या अंगातून महिन्यातून एकदा दुषित रक्त बाहेर पडत असतं. त्यामुळे त्यांनी शक्यतो चार महिन्यांतून एकदा रक्तदान करावे.

आजही अनेकांना असे वाटते की, रक्तदान केल्यामुळे हीमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते. पण मुळात असे काही नसते. रक्तदान केल्यानंतर २१ दिवसांनंतर शरीरात नवीन रक्त तयार होतं. शरीरातील हीमोग्लोबिनचे प्रमाण कमी झाले तर अनेक आजार होऊ शकतात. सतत थकणं, अशक्तपणा, श्वास घेण्यास त्रास होणं, चक्कर येणं, डोकं दुखणं अशा आजाराने माणूस त्रस्त होतो.एकावेळी कोणाच्याही शरीरातून ४७१ एमएलपेक्षा जास्त रक्त घेतले जात नाही. रक्तदान करण्याच्या एकदिवस आधी धुम्रपान करु नये. तसेच ४८ तासांपूर्वी मद्यपान करु नये. जर मद्यपान केले असेल तर रक्तदान करु नये. रक्तदान केल्यानंतर दर तीन तासांनी भरपेट खाणं गरजेचं आहे. रक्तदान केल्यानंतर ज्यूस, चिप्स, फळं यांसारखा आहार करावा. शरीराला आवश्यक पदार्थ सातत्याने खालले नाही तर त्याचा परिणाम लगेच दिसू लागतो. तसेच रक्तदान केल्यानंतर पुढील १२ तासांमध्ये कोणत्याही प्रकारचे व्यायाम करु नये. अनेक सांसर्गिक आजारांचा (एड्स, कावीळ) थोडा का होईना धोका असल्याने नातेवाईक, मित्रमंडळी यांचेच रक्त देणे केव्हाही चांगले.सध्याच्या लोकसंख्येच्या २ टक्के प्रमाणात जरी इच्छेने रक्तदान केले तर रक्तपेढीत कधीच रक्ताचा तुटवडा जाणवणार नाही किंवा रक्ताच्या एका थेंबावाचून कुणाचे प्राण जाणार नाहीत. मानवाने आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कितीही प्रगती केली तरी कृत्रिमपणे रक्त तयार करता येत नाही. मानवाला फक्त मानवाचेच रक्त चालते, म्हणून रक्तदान ही अमूल्य सेवा आहे.रक्तदान श्रेष्ठदान असे म्हटल जाते. कारण तुमच्या रक्तदानाने कुठल्या गरजू व्यक्तीचे प्राण वाचवले जाऊ शकते.

आजकाल ऐच्छिक रक्तदानाने वाढदिवस साजरा करण्याची जीवनशैली बरेचसे युवक अंगीकार करीत आहेत. मित्रमंडळीसमवेत शासकीय रक्तपेढीत जावून रक्तदानाने म्हणजेच जीवनदान देवून वाढदिवस साजरा होत आहे. रक्तपेढीत ‘बर्थ डे डोनर्स क्लब’ची संकल्पना रुजवत आहे. अनेक जण विचार करतात की आम्ही रक्तदान का करावे, त्याने आम्हाला काय फायदा होणार? रक्तदानाचे फायदे पाहता तुम्ही स्वतःहून नियमितपणे रक्तदान कराल. रक्तदान केल्याने तुमच्या हृदयाचे आरोग्य सुधारते. रक्ताचा प्रवाह सुधारतो आणि हार्ट अटॅकचा धोकाही कमी होतो नियमित स्वरुपात रक्तदान केल्यास अतिरिक्त लोह नियंत्रणात राहण्यास मदत होते. यामुळे हृदयाचे आरोग्य चांगले राहते.त्यामुळे शरीरातील आर्टरी ब्लॉकेज कमी होतो. त्यामुळे रक्तदान करणा?यामध्ये हार्ट अटॅकचा धोका ८८ टक्क्यांनी कमी होऊन जातो. नियमित रक्तदान करणारे लोक खूप कमी प्रमाणात दवाखान्यात भर्ती होत असतात. राक्तदात्याला हार्ट अटॅक, हार्ट स्ट्रोक आणि कॅन्सर सारखे आजार होण्याची शक्यता फार कमी असते.

जर तुम्हाला तुमचे वजन कमी करायचे असेल तर ते तुम्ही रक्तदान करून देखील करू शकता. रक्तदान हे फिट राहण्यासाठी एक योग्य आणि सुरक्षित पर्याय ठरू शकतो. एका वेळी रक्तदान केल्याने शरीरातील ६५० कॅलरीज कमी होतात, त्यामुळे जर तुम्ही दर तीन महिन्याला रक्तदान केले तर तुमच्या किती कॅलरीज कमी होतील पहा. रक्तदानामुळे कॅलरीज बर्न होतात आणि वजन घटण्यासही मदत होऊ शकते. शरीरात लाल रक्तपेशींचा स्तर योग्य प्रमाणात येण्यासही मदत होते. यादरम्यान, पौष्टिक आहार आणि नियमित व्यायाम करुन वजन नियंत्रण आणले जाऊ शकते. पण म्हणून वजन कमी करण्यासाठी रक्तदान करणे हा योग्य मार्ग ठरू शकत नाही. रक्तदानाची प्रक्रिया केवळ निरोगी आरोग्य राखण्याचे माध्यम आहे, वजन घटवण्याच्या योजनेतील हिस्सा नाही. आपण वाचत आहात माहिती सेवा ग्रूप पेठवडगावची पोस्ट, रक्तदानाआधी तुमचे चेक-अप केल्या जाते. ज्यामध्ये तुमच्या शरीराचे तापमान, पल्स रेत, ब्लड प्रेशर आणि हिमोग्लोबिन इत्यादीची तपासणी केली जाते. त्यानंतर रक्त टेस्ट साठी पाठवले जाते, ज्यामध्ये तुमच्या रक्तावर १३ वेगेवेगळे टेस्ट केले जातात. त्यामुळे जर तुम्हाला कुठला आजार झाला असेल, किंवा तुमच्या शरीरात कशाची कमी असेल तर ते तुम्हाला लगेचच कळत ई तेही फ्री.आपल्या शरीरात ५ ग्राम एवढे खीप असते. खीप जास्तकरून रेड ब्लड सेल्स आणि बोन मॅरोमध्ये असते. जेव्हा तुम्ही रक्तदान करता तेव्हा १/४ एवढे खीप निघून जाते. पण ह्या खीप ची कमतरता एका आठवड्यात तुमच्या जेवणातून भरून निघते. त्यामुळे शरीतील खींप चे संतुलन बनून राहते. तसेही शरीरात जास्त खींप ब्लड वेसल्स साठी हानिकारक असते.एका व्यक्तीच्या रक्ताने तीन लोकांचा जीव वाचवला जाऊ शकतो. रक्तदान प्रक्रियेमध्ये रक्तदानापूर्वी तुमचे रक्त आणि आरोग्याची वैद्यकीय तपासणी केली जाते. रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी तपासली जाते, संसर्ग, आजारांची तपासणी केली जाते. रक्तचाचणीद्वारे एखादी व्यक्ती रक्तदान करण्यास सक्षम आहे की नाही, याची माहिती मिळते.मग आता जर आपले रक्त दान केल्याने इतरांना तसेच आपल्यालाही फायदा होत असेल तर रक्तदान का करूनये.

# सफाई टेंडर दीड कोटीचे; शहर मात्र घाणीचे!

## कागदोपत्री ६० सफाई कामगार, प्रत्यक्षात २४ ते २५ जणच कामावर असल्याचा आरोप

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**हिंगोली - उपसंपादक**
**देवरत्न गव्हाणकर**

**हिंगोली :** कळमनुरी शहराच्या स्वच्छतेसाठी नगरपालिकेने तब्बल दीड कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे सफाईचे टेंडर काढले असतानाही शहरातील अस्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. टेंडरनुसार दररोज ६० सफाई कामगार उपलब्ध असणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ २४ ते २५ कामगारच कामावर असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे उर्वरित कामगारांच्या उपस्थितीबाबत तसेच त्यांच्या वेतनाबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.



शहरातील अनेक भागांमध्ये नाल्यांची साफसफाई वेळेवर होत नसल्याने कचरा व घाण साचत आहे. अनेक ठिकाणी कचरा उचलला जात नसल्याने तो रस्त्याच्या कडेला तसेच सार्वजनिक ठिकाणी पडून राहत आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, स्वच्छतेच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करूनही अपेक्षित परिणाम दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

शहरातील कचरा संकलन व स्वच्छतेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांची प्रत्यक्ष उपस्थिती, हजेरीपत्रक, वेतन तसेच कामाचे स्वरूप यांची प्रशासनाने सखोल तपासणी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख रस्ते, मंदिर परिसर तसेच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करणे आवश्यक आहे. मात्र, अनेक ठिकाणी कचरा व अस्वच्छता दिसून येत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. नवरात्रोत्सवापूर्वी शहराची स्वच्छता युद्धपातळीवर करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

नगरपालिकेच्या सफाई व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना शहराची स्वच्छता समाधानकारक होत नसेल, तर याची जबाबदारी निश्चित करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. टेंडरमध्ये नमूद केलेली कामगार संख्या, प्रत्यक्ष उपस्थिती, हजेरीपत्रक, वेतन देयके आणि केलेल्या कामाची पाहणी यांची संबंधित अधिकाऱ्यांनी तपासणी करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

तसेच, दररोजची हजेरी नीट नोंदवली जाते का, त्यानुसार वेतन अदा केले जाते का, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. सफाईचा ठेका घेतलेल्या संबंधित ठेकेदाराकडून अपेक्षित मनुष्यबळ व सेवा उपलब्ध करून दिली जात नसल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दीड कोटींच्या सफाई टेंडरनंतरही शहर अस्वच्छ राहणार असेल, तर एवढा मोठा खर्च नेमका कशासाठी? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, नगरपालिकेने या संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे.

# श्री शिवाजी विद्यालय गोभणी येथे दिनांक ०६ ऑक्टोबर २०२६ रोजी स्काऊट गाईड संघनायक शिबिर संपन्न

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**रिसोड- प्रतिनिधी**
**भागवत घुगे**

**रिसोड :** वाशिम भारत स्काऊटस आणि गाईडस जिल्हा कार्यालय वाशिम च्या वतीने आयोजित स्काऊट गाईड संघनायक शिबिर दिनांक ०६ ऑक्टोबर २०२६ रोजी श्री शिवाजी विद्यालय गोभणी ता. रिसोड येथे संपन्न झाले.

या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य जी एस बोडखे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक आबाराव हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराला



प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा संघटक स्काऊट के एल पवार, सहाय्यक जिल्हा आयुक्त स्काऊट गजानन गाठेकर, स्काऊट मास्टर व्ही एस अढाव, समाधान पोघे इत्यादींची उपस्थिती होती.

या शिबिरात श्री शिवाजी विद्यालय गोभणी, स्व. नरसिंगराव नथुजी बोडखे विद्यालय धोडप बु., रामरावजी झनक विद्यालय नेतन्सा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोवर्धन, श्री शिवाजी विद्यालय केनवड श्री बाबासाहेब धाबेकर विद्यालय नंधाना इत्यादी शाळेतील १२० पेक्षा जास्त स्काऊट गाईड विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्काऊट मास्टर समाधान पोघे यांनी केले तर आभार स्काऊट मास्टर व्ही एस अढाव यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्ही एस अढाव, व्ही एस सरकटे, डीडवाणी सर, कुमारी मिश्रा मॅडम, डी बी शिंदे, श्री घोटे सर सर्व सहभागी शाळेचे स्काऊट मास्टर गाईड कॅप्टन व आयोजक शाळेचे श्री घायाळ सर, केनवडकर सर, घोटे सर, ग्रंथपाल गजानन खराटे कुंडलिक झनक गणेश चव्हाण ,समीना अन्सारी अंभोरे मॅम, आणि सर्व स्काऊट गाईड यांनी परिश्रम घेतले.

# पीक हातातून गेले, उत्पन्न ठप्प, बँका व मायक्रो फायनान्सच्या वसुलीच्या तगाद्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वसमत - प्रतिनिधी**
**बालाजी अडकीने**

**वसमत :** वसमत तालुक्यातील शेतकऱ्यांवर दुष्काळाच्या संकटानंतर आता कर्जवसुलीच्या तगाद्याचे दुहेरी संकट ओढावले आहे. कमी पाऊस, पिकांचे मोठे नुकसान आणि आर्थिक अडचणींमुळे कर्जाचे हप्ते भरणे अशक्य झाले असून, विविध बँका व मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून सुरू असलेली कर्जवसुली तातडीने थांबवावी, अशी मागणी परजना येथील शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, वसमत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.


छाया : नागेश चव्हाण वसमत

दि.७ शेतकऱ्यांनी म्हटले आहे की, यावर्षी अत्यल्प पाऊस झाल्याने शेतीची अवस्था बिकट झाली आहे. निसर्गाची अवकृपा आणि पावसाअभावी पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. उत्पन्नाचे साधन असलेल्या शेतीतून अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने कर्जाचे हप्ते भरणे कठीण झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी विविध बँका व मायक्रो फायनान्स संस्थांकडून घेतलेल्या शेती व व्यावसायिक कर्जांची परतफेड करण्यासाठी सतत तगादा लावला जात असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. कर्जवसुलीच्या दबावामुळे शेतकरी आर्थिक व मानसिक अडचणीत सापडले असून, या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात बजाज फायनान्स, एयू स्मॉल फायनान्स बँक, श्रीराम फायनान्स, भारत फायनान्स, स्पंदना फायनान्स, कोटक बँक फायनान्स, एचडीएफसी बँक फायनान्स, मुथूट फायनान्स, स्वतंत्र फायनान्स, इंडसइंड बँक फायनान्स, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक, क्रेडिटबी, आयडीएफसी फर्स्ट बँक, बजाज फायनान्स, बंधन बँक वसमत, इंडिया शोल्टर फायनान्स, ॲक्सिस बँक वसमत आदी संस्थांकडील कर्जांचा उल्लेख करण्यात आला आहे. RBI तसेच महाराष्ट्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती व दुष्काळ निवारणासंदर्भातील मार्गदर्शक सूचनांचा दाखला देत, संबंधित शेतकऱ्यांच्या कर्जांचे पुनर्गठन (Loan Restructuring) असलेल्या कर्जवसुलीस तात्पुरती स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सर्व पात्र कर्जांना किमान एक वर्षाची स्थगिती (Moratorium) द्यावी आणि नियमबाह्य पद्धतीने तगादा लावणाऱ्या वसुली प्रतिनिधींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. परजना येथील शेतकऱ्यांच्या या निवेदनामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कर्जवसुलीपासून दिलासा मिळणार का आणि प्रशासन बँका-माईक्रो फायनान्स संस्थांना कोणते निर्देश देणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

# आजचे राशि भविष्य

**मेष :** हवेत इमले बांधण्याचा वास्तवात काहीही उपयोग नाही. आपल्या कुटुंबियांच्या अपेक्षांना योग्य न्याय देता येईल असे काही तरी करणे गरजेचे आहे. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल.

**वृषभ :** तुमचे मनमोकळे आणि निडर विचार तुमच्या मित्राला तुमचा गर्व आहे असे वाटून तो दुखावला जाईल. आज तुम्ही आपल्या घरातील सदस्याला कुठे फिरायला घेऊन जाऊ शकतात आणि तुमचे बरेच धन ही खर्च होऊ शकते.

**मिथुन :** तुमच्या मनातील नकारात्मक विचार झटकून टाका नाहीतर तो मानसिक आजार बनेल. दानशूर कार्यात स्वत:ला झोकून द्या व त्यायोगे नकारात्मक विचारावर मात करा.

**कर्क :** दिवसाची सुरवात तुम्ही योग साधनेने करू शकतात. असे करणे तुमच्यासाठी फायदेशीर असेल आणि पूर्ण दिवस तुमच्यात ऊर्जा राहील. काही महत्त्वाच्या योजना मार्गी लागल्यामुळे आपणास नव्याने अर्थसहाय्य उपलब्ध होईल.

**सिंह :** आपली उद्दिष्टे अपेक्षा पूर्ण होण्यासाठी खाजगी संबंधांचा वापर आपल्या पत्नीस आवडणार नाही. दीर्घकालीन दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून गुंतवणूक करणे गरजेचे आहे.

**कन्या :** कोणत्याही प्रकारे तुमची ताकद कमी पडतेय असे नाही तर तुमची इच्छाशक्ती कमी पडतेय. तुमची ख-या क्षमता काय आहेत ते ओळखा.

**तुळ :** तुम्हाला जीवनसाथी मिळाल्यामुळे दीर्घकाळ असणारी उदासवाणी एकाकी अवस्था संपून जाऊन वातावरण उत्साही बनेल. तुम्हाला आपल्या घरातील लहान सदस्यांसोबत वेळ घालवणे शिकले पाहिजे.

**वृश्चिक :** अनेक चिंतांनी ग्रासल्यमुळे तुमची प्रतिकारक्षमता घटेल आणि विचारशक्ती कुंठेल. सकारात्मक विचारसरणी बाळगून या आजाराशी सामना करण्यासाठी स्वत:ला उत्तेजन द्या.

**धनु :** मित्राने दिलेला ज्योतिषी सल्ला तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी तुम्हाला प्रवृत्त करेल. अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील.

**मकर :** तुम्ही तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे आणि तुमची भीती शक्य तितक्या लवकर घालवणेही आवश्यक आहे. कारण त्याचा तुमच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होऊ शकतो व चांगली प्रकृती बिघडण्याचा दाट संभव आहे.

**कुंभ :** आज घरी बसून आराम करण्याची गरज आहे - आणि आवडते छंद जोपासा व आनंद वाटेल अशा गोष्टी करा. जर आज तुम्ही आपल्या मित्रांसोबत कुठे फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल तर, विचार पूर्वक धन खर्च करा.

**मीन :** आज तुमचे स्वास्थ्य उत्तम राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुमच्या उत्तम स्वास्थ्य सोबत आज तुम्ही आपल्या मित्रांसोबत खेळण्याचा प्लॅन बनवू शकतात.

# खो-खो स्पर्धेत शिवाजी विद्यालयाचे दुहेरी यश

## १९ वर्षे वयोगटात मुलांचा व मुलींचा संघ तालुकास्तरावर अव्वल; विजेत्या खेळाडूंचा गौरव

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते



**लातूर (उदगीर) :** तालुका क्रीडा कार्यालय, उदगीर यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय १९ वर्षे वयोगटातील खो-खो स्पर्धेत हंडरगुळी येथील शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुलांच्या आणि मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. दोन्ही संघांनी सांघिक खेळ, वेगवान चपळाई आणि अचूक डावपेचांच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात करत विजेतेपद मिळविले.

स्पर्धेतील सामन्यांमध्ये शिवाजी विद्यालयाच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक व आत्मविश्वासपूर्ण खेळ केला. बचाव आणि आक्रमणाचा योग्य समन्वय साधत त्यांनी प्रतिस्पर्धी संघांवर वर्चस्व राखले. अंतिम सामन्यातही खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी बजावत विजय मिळविला. त्यामुळे मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही संघांनी तालुकास्तरीय विजेतेपदावर आपले नाव कोरले. या यशामागे खेळाडूंचा नियमित सराव, शिस्तबद्ध तयारी आणि क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. क्रीडा शिक्षक आर. जी. जाधव आणि बी. एस. नाटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी स्पर्धेची तयारी केली होती. त्यांच्या मार्गदर्शनासोबतच खेळाडूंची मेहनत आणि सांघिक भावना यामुळे विद्यालयाला हे दुहेरी यश मिळाले.

शिवाजी विद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीरचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, सचिव पी. टी. शिंदे, उपाध्यक्ष माधवराव पाटील, संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक डी. एम. तांबारे, पर्यवेक्षक बी. सी. सुगावे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थांनी विजेत्या संघांचे अभिनंदन केले.

विजेत्या दोन्ही संघांतील खेळाडूंचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करून त्यांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. या दुहेरी विजेतेपदामुळे शिवाजी विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली असून, आगामी जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी खेळाडूंच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.

# दुष्काळाची दाहकता शेताच्या बांधावर

## केसराळीत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे



### दुष्काळाची दाहकता प्रत्यक्ष पाहणीद्वारे शासनाच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न

### शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची अपेक्षा

पावसाअभावी खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. पंचनाम्याच्या आधारे शासनाने नुकसानीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन लवकरात लवकर पीकविमा, दुष्काळी मदत व इतर आवश्यक सवलती तातडीने उपलब्ध करून द्यावी ....

राजू पाटील मंनधरणे
सरपंच प्रतिनिधी केसराळी

**देगलूर :** पावसाने पाठ फिरवल्यामुळे खरीप हंगामातील पिकांची अवस्था बिकट झाली असून, शेतकऱ्यांवर दुष्काळाचे सावट अधिक गडद झाले आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक शेतांमध्ये पिकांची अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर केसराळी गावात खरीप पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करून पंचनामे करण्यात आले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशान्वये तसेच तहसीलदार गजानन शिंदे, उपविभागीय अधिकारी अजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पंचनामा प्रक्रिया राबविण्यात आली. नायब तहसीलदार मिठेवाड, मंडळ अधिकारी आदमपूर एन. जी. कानगुले यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांच्या संयुक्त पथकाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. या संयुक्त पथकात ग्रामपंचायत अधिकारी कैलास हम्पले, कृषी सहाय्यक तथा कृषी अधिकारी संतोष कोंडामोड, ग्राम महसूल अधिकारी जे. एम. करवंदे यांचा समावेश होता. पथकाने शेतातील पिकांची सद्यस्थिती, पावसाअभावी झालेली वाढीची घट, पिकांचे नुकसान आदी बाबींची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक माहिती नोंदवली.

पावसाच्या दीर्घ खंडामुळे सोयाबीनसह खरीप हंगामातील विविध पिकांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी, खत व फवारणीवर खर्च केला; मात्र पिकांना आवश्यक पाऊस न मिळाल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

पंचनाम्याच्या वेळी गावचे सरपंच प्रतिनिधी राजू पाटील मंनधरणे,पोलीस पाटील , महसूल सेवक राजाबाई गायकवाड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी उपस्थित होते.

प्रत्यक्ष पाहणी करून तयार करण्यात आलेल्या पंचनाम्याच्या अहवालातून केसराळी परिसरातील पिकांच्या नुकसानीची वास्तविक परिस्थिती शासनाच्या निदर्शनास येण्यास मदत होणार आहे.

# आमदार माऊली आबांच्या माध्यमातून शिंदोडीतील सिंगल फेज वीजप्रश्न मार्गी लागणार!

## गाडीलकर वस्ती, सोनवणे वस्ती चोरमले वस्ती व मानेवस्तीला सिंगल फेज वीज; १५ दिवसांत सर्वेक्षण व इस्टिमेटचे महावितरणचे आश्वासन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
शिरूर- प्रतिनिधी
इंद्रभान ओव्हाळ



**शिरूर :** शिरूर तालुक्यातील शिंदोडी ग्रामपंचायतीअंतर्गत, गाडीलकर वस्ती चोरमले वस्ती सोनवणे वस्ती व मानेवस्ती परिसरातील सिंगल फेज वीजप्रश्न आता मार्गी लागणार आहे. आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांच्या माध्यमातून या वाड्या-वस्त्यांसाठी सिंगल फेज वीज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ट्रान्सफॉर्मर (डीपी) बसविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. या मागणीसंदर्भात ग्रामपंचायतीच्या वतीने महावितरणकडे निवेदन देण्यात आले. महावितरणचे कार्यकारी उपअभियंता राजेंद्र धाडगे यांनी निवेदन स्वीकारून पंधरा दिवसांच्या आत संबंधित ठिकाणी सर्वेक्षण करून इस्टिमेट तयार करण्यात येईल. त्यानंतर ट्रान्सफॉर्मर डीपी बसवून सिंगल फेज वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांना दिले. यावेळी सरपंच अरुणराव खेडकर, सुदामराव धावडे सामाजिक कार्यकर्ते, उत्तमराव गायकवाड माजी ग्रामपंचायत सदस्य, इंद्रभान ओव्हाळ पत्रकार दैनिक चालु वार्ता हे उपस्थित होते. या वाड्या-वस्त्यांमध्ये अनेक वर्षांपासून सिंगल फेज वीज सुविधेचा प्रश्न प्रलंबित आहे. वीज उपलब्ध नसल्यामुळे नागरिक, महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आमदार माऊली आबा कटके यांच्या माध्यमातून सिंगल फेज वीजप्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. महावितरणकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. '१५ दिवसांत सर्वेक्षण व इस्टिमेट; त्यानंतर डीपी बसविण्याची कार्यवाही' महावितरणचे आश्वासन.

# कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयात डॉ.वसंतराव पवार यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन...!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नाशिक - प्रतिनिधी




इगतपुरी येथील गोवर्धने महाविद्यालयात डॉ.वसंतराव पवार यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन प्रसंगी प्राचार्य डॉ.किरण रकिबे व उपस्थित शिक्षक - शिक्षकेत्तर व विद्यार्थीवर्ग

**नाशिक/इगतपुरी :** नाशिक जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्राला नवी दिशा देणारे प्रख्यात चिकित्सक, शिक्षणतज्ज्ञ व माजी खासदार डॉ. वसंतराव निवृत्तीराव पवार यांच्या पुण्यतिथीनिमित्त इगतपुरी येथील कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयात आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण रकिबे यांच्या हस्ते डॉ. वसंतराव पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. या अभिवादन प्रसंगी डॉ. पवारांच्या आठवणीना उजाळा देताना महाविद्यालय प्राचार्य डॉ.किरण रकिबे यांनी डॉ. वसंतराव पवार यांनी नाशिक सिव्हिल हॉस्पिटल व स्वतःच्या 'सुश्रुत हॉस्पिटल'च्या माध्यमातून त्यांनी सामान्यांसाठी वैद्यकीय सेवा देत असताना विशेषतः पेठ, सुरगाणा आणि सिन्नर यांसारख्या दुर्गम आदिवासी भागात त्यांनी राबवलेली कुटुंबनियोजन आणि पोलिओ लसीकरणाची व्यापक मोहीम आरोग्य क्षेत्रात दिशादर्शक ठरली. त्यांच्या या उल्लेखनीय वैद्यकीय योगदानाबद्दल देशाचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या हस्ते त्यांना प्रतिष्ठेच्या 'डॉ.बी. सी. रॉय पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले होते. तर या अभिवादन प्रसंगी उपस्थितांनी डॉ. पवार यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक विचारांचे स्मरण करताना डॉ.वसंत पवार यांनी मराठा विद्या प्रसारक समाज (मविप्र) संस्थेचे सरचिटणीस म्हणून त्यांनी ग्रामीण भागातील मुलांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचवण्यासाठी मोलाची कामगिरी बजावली. त्यांच्या याच दूरदृष्टीची साक्ष म्हणून आज आडगाव येथे 'डॉ.वसंतराव पवार मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर' कार्यरत आहे. याशिवाय, १९९१ ते १९९६ या काळात नाशिकचे खासदार आणि २००४ पासून विधानपरिषद सदस्य म्हणून लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून त्यांनी जनसेवेचा ठसा उमटवला होता. या अभिवादन कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोंजी येथील मिलन सोनवणे मृत्यूप्रकरणी कठोर कारवाईची मागणी

## जनता पँथर सामाजिक संघटनेमार्फत निवेदन; सर्व आरोपींवर निष्पक्ष तपास, फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला व पीडित कुटुंबाला संरक्षण देण्याची मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अर्धापूर - प्रतिनिधी
शेख शादुल्ला शेख युनुस



**नांदेड :** जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील मौजे लोंजी येथे बौद्ध कुटुंबावर झालेल्या हल्ल्यात मिलन सोनवणे यांच्या मृत्यूप्रकरणी सर्व आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच प्रकरणाचा निष्पक्ष व जलद तपास करून फास्ट ट्रॅक/विशेष न्यायालयात खटला चालवावा, अशी मागणी जनता पँथर सामाजिक संघटनेमार्फत करण्यात आली. याबाबत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांच्या नावे जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकारी उपस्थित नसल्याने हे निवेदन आरडीसी तथा उपजिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

जनता पँथर सामाजिक संघटना प्रमुख आकाश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या या निवेदनात उपलब्ध माहितीनुसार या प्रकरणात १३ व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल असून १० आरोपींना अटक करण्यात आल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. मिलन सोनवणे यांच्या मृत्यूनंतर गुन्ह्यात खुनाचे कलम वाढविण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

पीडितांच्या पुरवणी जबाबातून पोलीस पाटील यांच्या भूमिकेबाबत गंभीर बाबी समोर आल्यास त्याची स्वतंत्र चौकशी करून, दोष आढळल्यास फौजदारी तसेच प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली. कोणत्याही राजकीय अथवा सामाजिक दबावाशिवाय तपास करण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली.

घटनेशी संबंधित CCTV फुटेज, मोबाईल रेकॉर्डिंग, प्रत्यक्षदर्शींचे जबाब, वैद्यकीय अहवाल, कॉल रेकॉर्ड व डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवून तपासात समाविष्ट करावेत, अशी मागणी करण्यात आली. लागू असल्यास SC/ST अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार आवश्यक कलमे लावावीत, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

पीडित कुटुंबाला कायमस्वरूपी पोलीस संरक्षण, साक्षीदारांना संरक्षण, कायद्यानुसार आर्थिक मदत, घरकुल व रोजगाराच्या माध्यमातून पुनर्वसन, मुलांच्या शिक्षणासाठी सहाय्य तसेच न्यायालयीन प्रक्रियेसाठी आवश्यक मदत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

'आरोपी अटक होणे म्हणजे न्याय मिळणे नव्हे; निष्पक्ष तपास, दोषींना शिक्षा आणि पीडित कुटुंबाचे संरक्षण व पुनर्वसन झाल्यानंतरच न्यायाची पूर्तता होईल,' अशी भूमिका जनता पँथर सामाजिक संघटनेने मांडली. यावेळी जनता पँथर सामाजिक संघटना प्रमुख आकाश चव्हाण, प्रवीण पाटील, शिवाजी गोडबोले, जयदीप पैठणे, संजय राक्षसे आणि सुनील गर्दनमारे उपस्थित होते.

संघटनेने स्पष्ट केले की, 'ही लढाई कोणत्याही समाजाविरुद्ध नसून अन्याय आणि हिंसेविरुद्ध आहे. आम्हाला बदला नको, संविधानाच्या चौकटीत न्याय हवा आहे.' तसेच या प्रकरणाचा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कालबद्ध आढावा घेऊन पीडित कुटुंबाला प्रत्यक्ष न्याय, संरक्षण व पुनर्वसन मिळवून द्यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली.

# दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी डॉ.नीलम गोऱ्हे उदगीर दौऱ्यावर

## शेतकऱ्यांशी साधणार थेट संवाद; पाणीटंचाई, चारा आणि महिला ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांचा घेणार आढावा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते



**लातूर (उदगीर) :** शिवसेना नेत्या, महाराष्ट्र विधान परिषदेच्या माजी उपसभापती तथा PCPNDT आणि MTP कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कृती दलाच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे या छत्रपती संभाजीनगर, बीड, उदगीर आणि लातूर जिल्ह्यांच्या दौऱ्यावर येत आहेत. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणी, पाणीटंचाई, पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता तसेच महिला ऊसतोड कामगारांच्या आरोग्यविषयक प्रश्नांचा त्या या दौऱ्यात आढावा घेणार आहेत.

डॉ.गोऱ्हे यांच्या दौऱ्याची सुरुवात बुधवार, ७ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथून होणार आहे. रात्री ८.४५ ते ९.३० या वेळेत त्या शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांशी अनौपचारिक संवाद साधणार आहेत. विमान आगमनाच्या वेळेनुसार या कार्यक्रमात बदल होण्याची शक्यता असून, भेटीचे ठिकाण ITC रामा इंटरनॅशनल हॉटेल आहे.

गुरुवार, ८ ऑक्टोबर रोजी बीड येथे सकाळी १०.३० ते ११.४५ या वेळेत PCPNDT कायद्याची अंमलबजावणी आणि महिला ऊसतोड कामगारांच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक होणार आहे. ही बैठक जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय परिसर, बीड येथे होणार आहे. यानंतर डॉ.गोऱ्हे उदगीर तालुक्यात दाखल होणार असून, दुपारी ४ वाजता करडखेल पाटी परिसरात शेतीची पाहणी करून दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेणार आहेत. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या अडचणी जाणून घेणार आहेत.

सायंकाळी ५ वाजता उदगीर येथे सुधाकर भालेराव यांच्या कार्यालयात शिवसेना पदाधिकाऱ्यांसोबत बैठक होणार आहे. या बैठकीत दुष्काळ, पाणीटंचाई आणि पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता यासह स्थानिक प्रश्नांवर चर्चा होणार आहे. शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी लातूर येथे सकाळी १०.३० वाजता शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. त्यानंतर सकाळी ११.३० ते दुपारी १.४५ या वेळेत गांधी मार्केट येथील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात आयोजित दुष्काळ निवारण मंचाच्या बैठकीस डॉ.गोऱ्हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना व महिला आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्थानिक प्रश्नांची संक्षिप्त निवेदने तयार ठेवावीत, तसेच दुष्काळ, पाणीटंचाई, चारा आणि शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शासकीय बैठकीतील उपस्थिती प्रशासनाच्या समन्वयाने राहणार आहे.

दुष्काळाच्या झळा तीव्र होत असताना डॉ. गोऱ्हे यांचा उदगीर दौरा महत्त्वाचा मानला जात असून, प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या प्रश्नांना शासनदरबारी कितपत वाचा फोडतात, याकडे आता शेतकरी आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा रक्षक आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांना CPR प्रशिक्षण

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
तुळजापूर - प्रतिनिधी
अक्षय मोरे



**तुळजापूर :** महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवींचा शारदीय नवरात्र महोत्सव ११ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयातील तळमजल्यावर आज सर्व सुरक्षा रक्षक तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचार व CPR (Cardiopulmonary Re-suscitation) देण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये एखादी व्यक्ती अचानक बेशुद्ध पडल्यास तिची प्राथमिक तपासणी कशी करावी, श्वासोच्छवास बंद झाल्यास CPR कशा पद्धतीने द्यावा, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने कोणती कार्यवाही करावी, याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. हे Basic Life Sup-port (मूलभूत जीवन आधार) प्रशिक्षण डॉ.श्रीराम नरवडे व डॉ. विकास क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शारदीय नवरात्र महोत्सवाच्या काळात तुळजापूर येथे मोठ्या संख्येने भाविक येत असतात. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी उद्भवणाऱ्या कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळावी, या उद्देशाने सुरक्षा व स्वच्छता कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी सुरक्षा निरीक्षक विक्रम कदम, ऋषिकेश पराडे, सहायक सुरक्षा निरीक्षक श्रीकांत पवार, ओम खुरुद, स्वच्छता निरीक्षक दयानंद जोगदंड, सुरक्षा पर्यवेक्षक अक्षय घुगे, अनिल लोखंडे, आनंद पाटील, राजेंद्र नरवडे, स्वप्नील इंडोरी तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

# म्हसळा नगरपंचायतीत राजीनामा नाट्यानंतर खांदेपालट!

## उपनगराध्यक्षा कमल जाधव यांच्या जागी राखी करंबे यांची बिनविरोध निवड होणार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
म्हसळा - प्रतिनिधी
अंगद कांबळे

**म्हसळा :** म्हसळा नगरपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यकाळ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना नगरपंचायतीतील राजकीय घडामोडींना आता वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्यातील राजकीय तडजोडीनंतर शिवसेना शिंदे गटाच्या उपनगराध्यक्षा कमल रविंद्र जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपनगराध्यक्ष पदावर आता शिवसेना नगरसेविका राखी अजय करंबे यांची वर्णी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उपनगराध्यक्षा कमल जाधव यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी नगराध्यक्ष सुनील शेडगे यांच्याकडे आपल्या पदाचा राजीनामा सादर केला होता. त्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी निवडणूक प्रक्रिया जलदगतीने राबविण्यात आली. दिनांक ६ ऑक्टोबर रोजी नगरसेविका राखी अजय करंबे यांनी मुख्याधिकारी विठ्ठल राठोड यांच्याकडे उपनगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विशेष म्हणजे आगामी निवडणुकीसाठी उपनगराध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज दाखल झाल्याने राखी करंबे यांची निवड बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दिनांक १२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेत त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा होणार आहे. राखी करंबे यांनी यापूर्वी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. म्हसळा नगरपंचायतीतील त्या शिंदे गटाच्या नगरसेविका म्हणून कार्यरत आहेत. आता राजकीय समीकरणे आणि झालेल्या तडजोडींच्या पार्श्वभूमीवर त्यांना उपनगराध्यक्ष पदाची संधी मिळणार असल्याने नगरपंचायतीच्या राजकीय वर्तुळात या घडामोडीची जोरदार चर्चा सुरू आहे. नगरपंचायतीचा विद्यमान पंचवार्षिक कार्यकाळ संपण्यास काही महिन्यांचा कालावधी असताना उपनगराध्यक्षपदात झालेला हा बदल विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. आगामी अडीच ते तीन महिन्यांच्या कालावधीसाठी राखी करंबे यांची उपनगराध्यक्षपदी निवड होणार असल्याने म्हसळा नगरपंचायतीच्या राजकारणात 'राजीनामा नाट्यानंतर खांदेपालट' झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

आता १२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेकडे म्हसळावासीयांचे लक्ष लागले असून राखी करंबे यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब होण्याची प्रतीक्षा आहे.

# सांगलीची लेक बनली टीम इंडियाची नवी कर्णधार!

## स्मृती मानधनाच्या हाती भारतीय संघाची कमान

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** झिम्बाब्वेविरुद्धच्या आगामी मालिकेसाठी (तीन टी-२०, तीन एकदिवसीय) भारतीय महिला संघाची घोषणा करण्यात आली आहे. संघात एक महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, स्टार फलंदाज स्मृती मानधना हिची नवीन कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हरमनप्रीत कौरने तिन्ही प्रकारांतील कर्णधारपदाचा अचानक राजीनामा दिल्यानंतर काही तासांतच बीसीसीआयने मानधनाच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. मानधना झिम्बाब्वे दौऱ्यापासून आपल्या या नवीन भूमिकेला सुरुवात करेल.

कर्णधारपदाची भूमिका स्मृती मानधनासाठी नवीन नाही, तिने यापूर्वी १८ टी-२० आणि ४ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व केले आहे. मात्र, मर्यादित षटकांच्या दोन्ही प्रकारांसाठी (टी-२० आणि एकदिवसीय) नियमित कर्णधार म्हणून बीसीसीआयने तिच्यावर जबाबदारी सोपवण्याची ही पहिलीच वेळ आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी शफाली वर्माची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे, तर एकदिवसीय संघासाठी दीप्ती शर्माकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.कर्णधारपद स्वीकारल्यानंतर, स्मृती मानधनाने भारतीय संघाचे नेतृत्व करणे हा मोठा सन्मान असल्याचे म्हटले. देशासाठी खेळणे ही तिच्यासाठी नेहमीच विशेष गोष्ट राहिली आहे आणि तिने ही नवीन जबाबदारी पूर्ण निष्ठेने पार पाडण्याचे वचन दिले. तसेच, तिने बीसीसीआय, निवड समिती, सहकारी खेळाडू आणि या प्रवासात तिला पाठिंबा देणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

**झिम्बाब्वे मालिकेसाठी भारतीय महिला टी-२० संघ**

स्मृती मानधना (कर्णधार), शफाली वर्मा (उपकर्णधार), निक्की प्रसाद, हरमनप्रीत कौर, अनुष्का शर्मा, रिचा घोष (यष्टिरक्षक), जी. कामलिनी (यष्टिरक्षक), दीप्ती शर्मा, प्रेमा रावत, श्री चरणी, नंदिनी शर्मा, क्रांती गौड, अरुंधती रेड्डी, जिंतीमणी कलिता आणि मिन्नू मणीझिम्बाब्वे मालिकेसाठी भारतीय महिला एकदिवसीय संघ

स्मृती मानधना (कर्णधार), शफाली वर्मा, प्रतिका रावल, हरमनप्रीत कौर, हरलीन देओल, तेजल हसबनीस, दीप्ती शर्मा (उपकर्णधार), रिचा घोष (विकेटकीपर), यास्तिका भाटिया (विकेटकीपर), वैष्णवी शर्मा, नंदिनी शर्मा, श्री चरणी, क्रांति गौड, सयाली सतघरे, रेणुका ठाकुर.

# श्रेयस अय्यरचा मोठा पराक्रम!

## तिन्ही फॉरमॅटमध्ये शतक, दिग्गजांच्या खास क्लबमध्ये एंट्री

दै.चालु वार्ता वृत्तसेवा




**मुंबई :** भारतीय टी२० संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरने मंगळवार, ६ ऑक्टोबर रोजी वेस्ट इंडिजविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी२० मालिकेतील पहिल्या सामन्यात धडाकेबाज शतक झळकावले. त्याने अवघ्या ४२ चेंडूंत हा टप्पा गाठला आणि भारतीय संघाला विजयाकडे नेले. या कामगिरीसह, आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत किमान एक शतक झळकावणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या प्रतिष्ठित गटात तो सामील झाला आहे. श्रेयसपूर्वी केवळ सहा भारतीय फलंदाजांनी तिन्ही प्रकारांत शतके ठोकली होती.

श्रेयस अय्यरने सर्वप्रथम एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतक झळकावले. ५ फेब्रुवारी २०२० रोजी हॅमिल्टन येथे न्यूझीलंडविरुद्ध त्याने ही कामगिरी केली होती. त्यानंतर, २५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरूझालेल्या कसोटी सामन्यात, आपल्या पदार्पणाच्या कसोटीतच त्याने शतक ठोकले. आता, ६ ऑक्टोबर २०२६ रोजी त्याने आपले पहिले टी२० आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केले आणि तिन्ही प्रकारांत शतके नोंदवणारा सातवा भारतीय खेळाडू ठरला. सुरेश रैना हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत शतके झळकावणारा पहिला भारतीय फलंदाज होता. त्यानंतर रोहित शर्माने ही कामगिरी केली. या यादीत केएल राहुल तिसऱ्या स्थानावर आहे, त्यानेही तिन्ही प्रकारांत शतके ठोकली आहेत. विराट कोहली चौथ्या स्थानावर आहे. त्याला हे साध्य करण्यासाठी बराच काळ लागला, तर शुबमन गिलने आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातच ही कामगिरी केली. श्रेयस अय्यरपूर्वी यशस्वी जयस्वाल या यादीत सामील झालेला सर्वात अलीकडील खेळाडू होता. आता श्रेयस अय्यरनेही या खास गटात आपले स्थान निश्चित केले आहे.

भारतासाठी तिन्ही प्रकारांत शतके झळकावणारे पुरुष क्रिकेटपटू सुरेश रैना, रोहित शर्मा, केएल राहुल, विराट कोहली, शुबमन गिल यशस्वी जयस्वाल

**श्रेयस अय्यर**

श्रेयस अय्यरने धडाकेबाज खेळी करत अवघ्या ४३ चेंडूंत १०२ धावा केल्या. या खेळीदरम्यान त्याने २३७.२१ च्या स्ट्राईक रेटने १० चौकार आणि ६ षटकार लगावले. त्याने अवघ्या ४२ चेंडूंमध्ये आपले पहिले-वहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केले. एका टप्प्यावर भारताला विजय मिळवण्यात काही अडचणींचा सामना करावा लागेल असे वाटत होते. मात्र, श्रेयसच्या आक्रमक फलंदाजीने सामना पूर्णपणे भारताच्या बाजूने झुकवला. भारतीय संघाने १७२ धावांचे लक्ष्य १५व्या षटकातच गाठले. इशान किशनने त्याला चांगली साथ दिली असली, तरी श्रेयस उत्कृष्ट लयीत होता आणि त्याने या सामन्यात एका वेगळ्याच दर्जाची फलंदाजी केली.

# उस्माननगर येथील बंद पाणीपुरवठा योजनेतील जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी तहसीलदार (सामान्य) जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्याकडून सूचना..

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

उस्माननगर - प्रतिनिधी

लक्ष्मण कांबळे

**नांदेड/ उस्माननगर :** कंधार तालुक्यातील मौजे उस्माननगर येथील बंद असलेली नळ पाणीपुरवठा योजना सुरू करणे सांडपाण्याची विधीवाट लावणे व वारंवार पाठपुरावा करूनही करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्याची सूचना विकास बिरादार तहसीलदार (सामान्य) जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना दिलेल्या पत्रात सूचना केली आहे. शिवशंकर मुकूद काळे (रा.उस्मानगर, ता.कंधार जि.नांदेड) यांनी संबंधित कार्यालयाकडे अर्ज सादर केला होता की, उस्माननगर येथील भिषण पाणी टंचाई भेडसावत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असते. येथे मागील भिषण पाणी टंचाईच्या काळात सहा जणांचा बळी गेला होता. याची सर्वांना माहीती असून सुद्धा चालढकल पणा करतात. जिल्हा परीषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (म.जी.प्रा.) एकमेकांकडे बोट दाखवणारी कागदपत्रांची देवाणघेवाण केली आहे. म.जी.प्रा. ने स्पष्ट केले आहे की रस्त्याच्या कामात पाईपलाईन तुटली आहे. तर जिल्हा परीषदेने स्थानिक पातळीवर तात्पुरती सोय करण्याचे निर्देश दिले होते. परंतु आज दोन महिने उलटून गेले तरी प्रत्यक्ष जमिनीवर पाईपलाईन दुरुस्ती केली नाही व उस्माननगर गावातील नागरिकांना एक थेंबही पाणी मिळालेले नाही या गंभीर प्रकरणात खालील मुदयावंर तातडीने निर्णय व्हावा, जलजीवन मिशनचा बोजवारा केंद्र व राज्य सरकार हर घर जल योजनाचा चा मोठा प्रचार करत असतांना गावाला कोट्यावधी रुपये खर्च करूनही थेंबभर पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती करावी लागत आहे. ही योजना नेमकी कोणाच्या निष्काळजीपणामुळे बंद आहे असे अर्जात नमुद केले आहे. उक्त प्रकरणात तात्काळ नियमानुसार कार्यवाही करावी व आपण केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधीतांना आपले स्तरावरुन अवगत करावे व आपण केलेल्या कार्यवाहीची एक प्रत या कार्यालयास माहीतीस्तव कळवावे असे पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे... शिवशंकर काळे यांच्या सतत पाठपुरावा केल्यामुळे प्रशासन हात पाय हालवत असल्याचे दिसून येत आहे. यंदा तर भयानक परिस्थिती निर्माण होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ उपाय योजना सुरू केली तर ठिक नाही तर अनेकांचा बळी गेल्याशिवाय राहणार नाही....

# नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर शहरातील पथदिव्यांची दुरुस्ती सुरू

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

तुळजापूर - प्रतिनिधी

अक्षय मोरे



**तुळजापूर :** शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर शहरात नगरपरिषदेकडून विविध तयारीच्या कामांना वेग आला आहे. शहरातील रस्त्यांवरील पथदिव्यांची दुरुस्ती व देखभालीचे काम सुरूकरण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवासाठी तुळजापूर शहरात राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार आहेत. त्यामुळे प्रमुख रस्ते, चौक आणि भाविकांची वर्दळ असलेल्या परिसरात प्रकाशव्यवस्था सुरळीत ठेवण्यावर नगरपरिषदेकडून भर दिला जात आहे.

पथदिव्यांची दुरुस्ती करण्यासाठी वाहनावरील उंच प्लॅटफॉर्मच्या सहाय्याने कर्मचारी काम करत असल्याचे दिसून आले. नवरात्रोत्सव काळात रात्रीच्या वेळी भाविकांची गैरसोय होऊ नये, तसेच शहरातील वाहतूक व सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रकाशव्यवस्था व्यवस्थित राहावी, यासाठी ही कामे महत्त्वाची ठरणार आहेत.

# आर्वीत 'विकसित भारत संकल्प सभा' उत्साहात सेवा ज्योती यात्रेला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

वर्धा - उपसंपादक

अवधूत शेंद्रे




**वर्धा - आर्वी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्री ते पंतप्रधान अशा २५ वर्षांच्या सार्वजनिक जीवनाचा गौरव करण्यासाठी आर्वी विधानसभा क्षेत्रात 'विकसित भारत संकल्प सभा' व 'सेवा ज्योती यात्रा' उत्साहात पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात भाजपा तालुकाध्यक्ष राजेंद्र ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या भव्य बाइक रॅलीने झाली. मुख्य कार्यक्रमात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आमदार सुमित वानखेडे, भाजपा नेते सुनील गफाट, विजय वाजपेयी, प्रशांत वानखेडे, नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने, राजेंद्र ठाकरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सुनील गफाट यांनी मोदी सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा आढावा घेतला. आमदार सुमित वानखेडे यांनी अवघ्या १२ तासांत कार्यक्रमाचे नियोजन करून तो यशस्वी करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या उत्साहाचे कौतुक केले. मोदींचे नेतृत्व आणि कार्यकर्त्यांची ऊर्जा यामुळे संघटन अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी 'विकसित भारत'ची शपथ देण्यात आली. तसेच उषा सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दुष्काळी परिस्थितीवर आधारित पथनाट्य सादर केले. भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपणही उपस्थितांनी ऐकले. शिस्तबद्ध नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# ई-कार्ड मशीन बंद; उदगीर-अहमदपूर एसटीत वाहकाची मुख्यमंत्र्यांसह प्रवाशांना शिवीगाळ

## प्रवाशांना तोंडार पाटी येथे उतरवण्यात आले

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

वाढवणा - प्रतिनिधी

संतोष कांबळे




**उदगीर :** उदगीरहून अहमदपूरकडे जाणाऱ्या एसटी बसमध्ये ई-कार्डच्या तांत्रिक अडचणीवरून प्रवासी आणि वाहक (कंडक्टर) यांच्यात वाद झाल्याची घटना आज, ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते ११ वाजण्याच्या सुमारास घडली. या वादादरम्यान वाहकाने प्रवाशांना तसेच त्यांच्या आई-बहिणींविषयी अत्यंत आक्षेपार्ह भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, MH 13 CU 8607 क्रमांकाची उदगीर-अहमदपूर बस उदगीरहून अहमदपूरकडे जात होती. बसमधील चार प्रवाशांकडे ई-कार्ड उपलब्ध होते. मात्र ई-कार्ड मशीन तांत्रिक अडचणीमुळे सुरू होत नसल्याचे वाहकाने सांगितले आणि प्रवाशांना पूर्ण तिकीट घेण्यास सांगितले. प्रवाशांनी कार्डमध्ये पैसे उपलब्ध असल्याचे सांगून मशीन तपासून पाहण्याची विनंती केली. यावरून प्रवासी आणि वाहक यांच्यात शाब्दिक वाद झाला.

वाद वाढल्यानंतर वाहकाने प्रवाशांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. तसेच राज्य सरकारची संबंधित योजना सुरू करणाऱ्या मुख्यमंत्र्यांबद्दलही अपशब्द वापरल्याचे प्रवाशांनी सांगितले. यावेळी वृद्ध प्रवाशांशीही वाहकाने आक्रमक पद्धतीने वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शेवटी प्रवाशांना तोंडार क्रॉसिंग येथे बसमधून उतरवण्यात आले आणि तेथपर्यंतचे तिकीट रोख रकमेने देण्यात आल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. संबंधित चारही प्रवासी वृद्ध असून त्यांना रक्तदाब व मधुमेहाचा त्रास असल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेनंतर प्रवाशांनी ऑनलाइन पोलिस तक्रार नोंदविल्याचे सांगितले आहे. सार्वजनिक वाहतूक सेवेत प्रवाशांशी अशा प्रकारे अपमानास्पद आणि अर्वाच्य भाषेत बोलणे योग्य नसून, विशेषतः वृद्ध प्रवाशांशी झालेल्या या कथित गैरवर्तनाची एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. घटनेची चौकशी करून आरोप तथ्यात्मक आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

## ✲ चुटकुले ✲

बाबा: बंड्या, तू शाळेत का मार खाऊन आलास रे आज?

बंड्या: बाबा, मास्तरनी विचारलं होतं – 'फळा कुठल्या रंगाचा असतो?' मी म्हटलं काळा!

बाबा: बरोबर आहे मग, मग का मारलं?

बंड्या: मग मास्तरनी विचारलं – 'शाळा कोणती?' मी म्हटलं तुझी! आणि 'मास्तर कोण?' तर म्हटलं गड्या!

बाबा: तु काय म्हणालास?

बंड्या: तो फळा, ती शाळा आणि ते मास्तर!

## सुविचार

स्वप्न तीच खरी जी झोपू देत नाहीत, अपयश ही यशाची पहिली पायरी असून स्वतःवर ठेवलेला विश्वास अधी लढाई जिंकून देतो.

# शेती विषय बाजार भाव माहिती

| शेतमाल | एकक | आवक | किमान (रु.) | कमाल (रु.) | सरासरी (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| तांदुळ (बासमती) | क्विंटल | ९७ | ९३०० | १२५०० | १०९०० |
| तांदुळ (कोलम) | क्विंटल | ५५२ | ५००० | ८२०० | ६६०० |
| तांदुळ (इंद्रायणी) | क्विंटल | १२१ | ५००० | ६६०० | ५८०० |
| गहु (लोकवन) | क्विंटल | २८२३ | ३००० | ४००० | ३५०० |
| गहु (गुजरात विनाट) | क्विंटल | ६६५ | ३६०० | ४८०० | ४२०० |
| गहु (सिहोर) | क्विंटल | ५२८ | ४८०० | ६८०० | ५८०० |
| ज्वारी (मालदांडी नं.१) | क्विंटल | ७०९ | ६२०० | ६८०० | ६५०० |
| ज्वारी (वसंत नं.९) | क्विंटल | ६१९ | ४३०० | ४७०० | ४५०० |
| ज्वारी (दुरी) | क्विंटल | ५५० | ४१०० | ४५०० | ४३०० |
| बाजरी (गावरान) | क्विंटल | ७०५ | ३१०० | ३४०० | ३२५० |
| बाजरी (संकरीत) | क्विंटल | ४७१ | ३२०० | ३६०० | ३४०० |
| बाजरी (महिको नं.९१०) | क्विंटल | ५६३ | ३४०० | ३७०० | ३५५० |
| मिरची (ब्याडगी) | क्विंटल | ४ | ३८००० | ४०००० | ३९००० |
| मिरची (गुंटूर) | क्विंटल | २ | २७००० | २८००० | २७५०० |
| मिरची (लवंगी) | क्विंटल | ४ | २४००० | २५००० | २४५०० |
| वाटाणा (हिरवा) | क्विंटल | ४५ | ६००० | ७००० | ६५०० |
| वाटाणा (पांढरा) | क्विंटल | ३५ | ५००० | ५७०० | ५३५० |
| मसूर | क्विंटल | ४४ | ७००० | ७६०० | ७३०० |
| धना (इंदौर) | क्विंटल | २ | १२००० | १३००० | १२५०० |
| धना (गावरान) | क्विंटल | २ | १०००० | १२००० | ११००० |
| हरभरा (चाफा) | क्विंटल | ४३ | ७३०० | ८००० | ७६५० |
| हरभरा (संकरीत) | क्विंटल | ३६ | ७२०० | ७८०० | ७५०० |
| उडीद | क्विंटल | ६ | ९००० | १०५०० | ९७५० |
| मका (तांबडा) | क्विंटल | २ | २५०० | २९०० | २७०० |
| चिंच (जुनी) | क्विंटल | २ | ९००० | ११००० | १०००० |
| चिंच (नवी) | क्विंटल | ३ | ११००० | १३००० | १२००० |
| शेंगदाणे (घुंगरू) | क्विंटल | ७३९ | १३४०० | १४२०० | १३८०० |
| शेंगदाणे (जाडा) | क्विंटल | ३६३ | ११५०० | १३००० | १२२५० |
| शेंगदाणे (स्पॉनिश) | क्विंटल | ४९२ | १४००० | १५५०० | १४७५० |
| हळद (राजापुरी) | क्विंटल | २ | २०००० | २४००० | २२००० |
| मुग हिरवा | क्विंटल | ४७ | ९१०० | ९७०० | ९४०० |
| हुलगा | क्विंटल | ४ | ६४०० | ७५०० | ६९५० |
| चवळी | क्विंटल | ५ | ८५०० | १०५०० | ९५०० |
| वरई | क्विंटल | ६ | १०००० | ११५०० | १०७५० |
| नाचणी | क्विंटल | २ | ५५०० | ६००० | ५७५० |
| गुळ (पिवळा नं.१) | क्विंटल | ४४९ | ४७७५ | ४८५१ | ४८१३ |
| गुळ (पिवळा नं २) | क्विंटल | ३३१ | ४६०१ | ४७५१ | ४६७६ |
| गुळ (लाल) | क्विंटल | ३५८ | ४४७५ | ४५९५ | ४५३५ |
| गुळ (बॉक्स) | क्विंटल | ४३० | ४४०० | ५९०० | ५१५० |

# गुंजरगा येथे महसूल, कृषी व पंचायत विभागाची संयुक्त पीक पाहणी

## खरीप हंगाम २०२६ : कोरड्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या नुकसानीची पीक पाहणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

औसा - प्रतिनिधी

जीवन जाधव



**निलंगा :** निलंगा तालुक्यातील गुंजरगा येथे खरीप हंगाम २०२६ मधील कोरड्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महसूल, कृषी व पंचायत विभागाच्या वतीने संयुक्त पीक पाहणी करण्यात आली. पावसाअभावी खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला असून, अनेक शेतकऱ्यांच्या पिकांची वाढ खुंटली आहे. काही ठिकाणी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या पथकाने प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची पाहणी करून नुकसानीची परिस्थिती जाणून घेतली. यावेळी विविध पिकांची सद्यस्थिती, पावसाचे प्रमाण, पिकांचे नुकसान तसेच शेतकऱ्यांच्या अडचणींची माहिती घेण्यात आली. संयुक्त पीक पाहणीच्या अहवालाच्या आधारे शासनाकडून दुष्काळी मदत व नुकसानभरपाईसाठी पुढील कार्यवाही होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

कोरड्या दुष्काळाच्या संकटात प्रशासनाने केलेल्या या पाहणीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीची आशा निर्माण झाली आहे. यावेळी धनराज रचप्पा मुळे, सुरेश धुमाळ. दिपक गिरी मारुती धुमाळ.काशिनाथ तुळशीराम शिंदे ज्ञानेश्वर लक्ष्मण गोबाडे, रमेश तुकाराम धुमाळ. मनोज भास्कर शिंदे .माधव तुकाराम शिंदे.सिध्देश्वर अंगद शिंदे मनोज बालाजी शिंदे, छत्रुगण किशन शिंदे. ओमप्रकाश शिवाजी शिंदे, भिम शिवाजी धुमाळ. परमेश्वर विश्वनाथ शिंदे. दिगंबर यादव धुमाळ.दिगंबर शिंदे. नंदकुमार शिंदे. बाळु भीम शिंदे. सह गुंजरगा शिवारातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.